




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०१६ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com


# रावणाचा अहंकारही जळून खाक झाला, शिंदेंचा इशारा

## त्यांच्याकडे लक्ष देऊ नका, फडणवीसांचा टोला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महायुतीच्या सरकारमध्ये एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्या नेत्यांची भाषा आता थेट लंकादहन आणि अंहकारापर्यंत जाऊन पोहोचल्याचं दिसतंय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील सुप्त संघर्ष निवडणुकीच्या निमित्ताने पाहायला मिळतोय. या दोन्ही नेत्यांची भाषा आता थेट लंकादहन आणि अंहकारापर्यंत जाऊन पोहोचल्याचं दिसत आहे. अहंकाराविरोधात एकत्र आलोय आणि याच अहंकारामुळे रावणाची लंकी जळाली असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला होता. त्यावर आपण लंकेत राहत नाही, त्याकडे दुर्लक्ष करा असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी टोला लगावला. पालघरमध्ये नगरपालिकेत भाजप विरुद्ध शिवसेना अशी थेट लढत आहे. भाजपविरोधात या ठिकाणी शिंदेंच्या शिवसेनेच्या पाठीशी इतर सर्व पक्ष एकवटले आहेत. त्यामुळे शिंदेसेना आणि भाजपमधील शाब्दिक वार आता अधिक तीव्र होताना दिसतंय.

पालघरमधील सभेत बोलताना एकनाथ शिंदे यांनी भाजपवर टीका केली होती. अहंकार तर रावणामध्येही होता. अहंकारामुळे रावणाची लंका जळून खाक झाली असं शिंदे म्हणाले होते. त्याला देवेंद्र फडणवीसांनी उत्तर दिलं. कुणी काय म्हणतंय त्याकडे लक्ष देऊ नका. आपण तर लंकेत राहत नाही, आपण रामाचे अनुयायी आहोत असं फडणवीस म्हणाले.



मंत्रिमंडळात एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्या फडणवीस आणि शिंदेंमध्ये सारं काही आलबेल नसल्याचं वारंवार दिसून आलं आहे. मंत्र्यांचे अधिकार, मिळणारा निधी असो किंवा फोडाफोडीचं राजकारण असो, या दोघांमध्ये सातत्यानं खटके उडाल्याचं पाहायला मिळत आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या तोंडावर फडणवीस आणि शिंदेंमधली खदखद पुन्हा चव्हाट्यावर आली आहे.

भाजप नेते आणि शिंदेंचे पारपंरिक शत्रू गणेश नाईक हे पालघरचे पालकमंत्री आहेत. त्यामुळे शिंदेंच्या वक्तव्याला चांगलीच धार चढलेली पाहायला मिळाली. त्यामुळे फडणवीसांनीही चांगलाच वचपा काढल्याचं दिसून आलं. एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना गणेश नाईकांनी त्यांच्यावर टीका केली. दुसऱ्याला कमी लेखून मोठं होता येत नाही असं ते म्हणाले. तर भारतीय जनता पक्षाची ताकद जास्त असल्याने आपल्या विरोधात सर्व विरोधक एकवटले आहेत, मतदारांनी त्यांना उत्तर द्यावं असं प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले.

लंकादहनावरुन पडलेली ठिणगी आता लाडकी बहीण योजनेच्या श्रेयवादापर्यंत पोहोचली आहे. लाडकी बहीण योजना आपण मुख्यमंत्री असताना सुरू केली, त्यामुळे ही योजना बंद होणार नाही असा प्रचार शिंदे निवडणुकीत करताना दिसत आहे.

तर देवाभाऊ असेपर्यंत लाडकी बहीण योजना कधीच बंद होणार नाही, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी प्रचारावेळी दिलं.

## थोडक्यात...

### रस्त्यावरील नशाबाज, भिकाऱ्यांची बोगस नावे मतदारयादीत

मुंबई (समर्थ गांवकरी) : एकीकडे मुंबईत 11 लाख दुबार मतदार वाढल्याचा आरोप केला जात असताना दुसरीकडे बोगस मतदारांची यादी चव्हाट्यावर आणली जात आहे. चेंबूर येथील पुरुष शासकीय भिक्षुक गृहातील 100 हून अधिक भिक्षुकांची मतदार यादीत मतदार म्हणून नोंदणी करण्यात आल्याचा प्रकार मनसेने उघडकीस आणला. तसेच या भिक्षुक गृहात सध्या राहत नसलेल्यांचीही नावे मतदार यादीत नोंदवण्यात आली आहेत. त्यामुळे मनसेने या भिक्षुक गृहावर धडक मोहीम राबवत अधिकाऱ्यांना जाब विचारला. चेंबूरच्या वॉर्ड क्रमांक 152 मध्ये बेगर्स होम म्हणजे शासकीय भिक्षुक केंद्र आहे. सिग्नलवर जे भिकारी असतात, किंवा नशा करणाऱ्या लोकांना या केंद्रात आणलं जातं. अशा लोकांचीही नावे या मतदारयादीत आहेत. या यादीमध्ये अशा अनेकांची नावे आहेत जी सध्या त्या ठिकाणी राहत नाहीत. याबद्दल बोलताना मनसेचे चेंबुर विभागाध्यक्ष माऊली थोरवे म्हणाले की, "या सुधारकेंद्रात ज्या भिक्षुकांची नावे नोंदवण्यात आली आहेत त्यांची यादी आमच्याकडे आहेत. यामध्ये 100 हून अधिक मतदार आहेत. या मतदारयादीमध्ये ज्यांनी नावे आहेत त्यापैकी अनेकजण आता केंद्रात राहत नाहीत.

# उच्च न्यायालयात जाणार

## उज्वला थिटे यांची माहिती

**सोलापूर : (समर्थ गांवकरी)**

सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत नगराध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्ज्वला थिटे यांनी सोलापूर सत्र न्यायालयात धाव घेतली होती. आपल्या उमेदवारीचा अर्ज बाद केल्यानंतर त्यांच्या अर्जावरील अपील संदर्भातील सर्व बाजूचे युक्तिवाद आज न्यायालयात पूर्ण झाले आहेत. न्यायाधीशानी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उज्ज्वला थिटे यांचा अपील अर्ज फेटाळला आहे. यानंतर उज्ज्वला थिटे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या निर्णयाच्या विरोधात आम्ही उच्च न्यायालयात जाऊ असे मत उज्वला थिटे यांनी व्यक्त केले आहे.

सोलापूर सत्र न्यायालयाने उज्ज्वला थिटे यांचा अपील अर्ज फेटाळला आहे. या निर्णायविरोधात आम्ही उच्च न्यायालयात जाऊ अशी भूमिका उज्वला थिटे यांनी मांडली आहे.

# देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाहीला फासावर लटकवले

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जहरी टीका केली आहे. देवेंद्र फडणवीस यांचा त्यांनी जल्लाद म्हणून उल्लेख केला आहे. जल्लाद हा फासावर लटकवण्याचं काम करतो. तसंच देवेंद्र फडणवीस हे देखील लोकशाहीला फासावर लटवकण्याच काम करत असल्याची टीका सकपाळ यांनी केली आहे. श्रीरामपूर येथील भाषणात बोलताना हर्षवर्धन सकपाळ यांची जीभ घसरल्याचं पाहायला मिळाल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर त्यांनी जहरी शब्दात टीका केली आहे. सचिन गुजर यांचं अपहरण केल्यानंतर सकपाळ यांनी आज श्रीरामपुर येथे जाऊन गुजर यांची विचारपुस केली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका केली.



मी त्यांना ओळखत नाही, महाराष्ट्रात कोणीही त्यांना ओळखत नाही. मी कशाला त्यांच्यावर वेळ वाया घालू, मी कशाला त्यांच्यावर बोलू असं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हर्षवर्धन सपकाळ यांनी खोचक टोला लगावला. मी सकारात्मक मत मागण्यासाठी आलो असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. ज्यांना कोणी ओळखत नाही ज्यांना कोणी मानत नाही, असं म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या टीकेला त्यांच्या जिल्ह्यात जाऊन दिले प्रतिउत्तर दिलं. चिखली शहर भारतीय जनता पार्टीच महायुतीच शहर असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. चिखली शहरात चौकात ज्या ज्या वेळी मी आलो ज्या ज्या वेळी प्रार्थना केली तुम्हाला विनंती केली. त्या त्या वेळी माझ्या विनंतीला प्रतिसाद देत तुम्ही कमळाचे बटण दाबले भारतीय जनता पक्षाला विजयी केल्याचे फडणवीस म्हणाले.









# मारोती सुंकलवाड यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

किनवट : (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील महत्त्वाच्या 'दिशा' समितीचे अशासकीय सदस्य, धडाडीचे शिवसैनिक आणि माजी पंचायत समिती सभापती मारोती सुंकलवाड यांची 'लोककल्याण ग्राहक संस्थे'च्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ग्राहक हक्कांचे संरक्षण आणि ग्राहक हित जपणारे कार्य सुंकलवाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात अधिक प्रभावीपणे राबवले जाईल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. या निवडीचे अधिकृत पत्र गोदावरी



अर्बनच्या मुख्य कार्यालयात आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात सुंकलवाड यांना सुपूर्द करण्यात आले. 'ग्राहक कल्याण संस्थे'चे राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांच्या प्रमुख उपस्थितीत, राज्याचे मंत्री तथा विधान परिषद आमदार हेमंत पाटील यांच्या हस्ते हे नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे विविध पदाधिकारी, शिवसैनिक तसेच आमदार हेमंत पाटील यांचे संपर्क अधिकारी सुनील गरड पाटील आणि योगेश जायभाये यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. मारोती सुंकलवाड हे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात एक सक्रिय आणि परिचित नाव आहे. पंचायत समिती सभापती म्हणून त्यांनी आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी धडाडीने काम केले आहे. त्यांची 'दिशा' समितीवरील अशासकीय सदस्य म्हणून असलेली भूमिका देखील महत्त्वाची आहे. 'लोककल्याण ग्राहक संस्थे'च्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर, सुंकलवाड यांनी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला ग्राहक म्हणून असलेल्या त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे, ग्राहकांची फसवणूक थांबवणे आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करणे, हे आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगितले. त्यांच्या या निवडीमुळे ग्राहक संरक्षण चळवळीला जिल्ह्यात एक नवीन बळ मिळेल, असा विश्वास राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांनी व्यक्त केला.



नायगाव तालुक्यातील बरबडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व कन्या शाळात संविधान दिनानिमित्त गंगाधर बड्डुरे जिल्हा प्रमुख शिवसेना शिंदे गट यांच्या डोळस संकल्पनेतून बरबडा येथील आपन जिल्हा परिषद शेळेसाठी काहीतरी देणे लागतो या डोळस संकल्पनेतून शालेय साहित्य वही पेन कंपास पेटी याच वाटप करण्यात आले आहे गंगाधर बड्डूरे यांच्या संकल्पतेतुन बरबडा सर्कल मधील सर्व जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप करण्याचा केला आहे. त्याची सुरवात या बरबडा येथील शाळेतून करण्यात आली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### उपनिबंधक प्रशांत काळे यांचे न्याय देण्याचे आश्वासन!

ठाणे (स. गांवकरी) : आरामबाग इस्टेट, ठाणे येथे शिधावाटप कार्य बांध व परिमंडळ कार्यालयात दिव्यांग व निराधार महिलांना नाहक त्रास देत योजनांपासून वंचित ठेवण्यात येत असल्याच्या तक्रारींवर अपंग संजीवनी संस्थेने पुढाकार घेतला. संस्थेचे संस्थापक श्री. सुरेश दुधाने, सौ. वनिता फडतरे, तसेच कुंदा धनवटे यांनी आज उप निबंधक शिधावाटप माननीय प्रशांत काळे साहेब यांची भेट घेऊन संबंधित समस्या मांडल्या. संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, रेशन कार्डवर निराधार महिलांसाठी २१,००० रुपये व दिव्यांगांसाठी ५०,००० रुपये उत्पन्न नमूद करण्यासाठी अधिकाऱ्यांकडून नाहक दिरंगाई केली जात आहे. या दिरंगाईमुळे लाभार्थींना विविध योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. याबाबत गंभीरता दाखवित प्रशांत काळे साहेबांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. दिव्यांग व निराधार महिलांना योग्य हक्क आणि न्याय मिळेल याची पूर्ण काळजी घेऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले. अपंग संजीवनी संस्थेच्या हस्तक्षेपामुळे अनेक लाभार्थ्यांच्या समस्या मार्गी लागण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

### ठाणे जिल्हा परिषदेत ई-ऑफिसद्वारे कागदविरहित कामकाजाकडे वाटचाल




ठाणे (स. गांवकरी) : जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत १५० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत सर्व विभागांमध्ये कागदविरहित कामकाजाला मोठ्या प्रमाणात गती मिळाली आहे. प्रशासनातील सर्व फाईली ई-ऑफिस प्रणालीद्वारे तयार केल्या जात असून यामुळे कामकाजात पारदर्शकता, गती, तसेच ग्रामस्थांच्या विविध प्रश्नांचे जलद निराकरण प्रभावीपणे होत आहे. ठाणे जिल्हा परिषद आणि सर्व पंचायत समित्यांमध्ये ई-ऑफिस प्रणालीअंतर्गत झालेल्या कामकाजाची प्रगती उल्लेखनीय आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी- कर्मचारी यांचे ई-ऑफिस प्रणालीअंतर्गत युजर आयडी तयार करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेत १७ हजार १४६ ई-फाईल्स निपटारा करण्यात आल्या आहेत आणि ४६ हजार ५८९ ई-रिसीट्स (टपाल) तयार झाल्याची नोंद आहे. ही परिपूर्ण व प्रभावी आकडेवारी ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाच्या कागदविरहित, पारदर्शक आणि गतिमान डिजिटल परिवर्तनाची भक्कम पावले अधोरेखित करते. ई ऑफिस प्रणालीमुळे फाईल ट्रॅकिंग सुलभ व वेगवान, फाईलचा प्रवास कोणत्याही टप्प्यावर सहज तपासता येतो, विलंब होण्याची शक्यता कमी, पारदर्शक कामकाज, निर्णय प्रक्रियेला गती, नागरिकांच्या अर्ज, विनंत्या व तक्रारींचा जलद निपटारा होणार आहे.




### पुरी येथे आदिवाशी सेवा केंद्राचे उद्घाटन

रावेर (स. गांवकरी) : आदिवाशी गावांचा सर्वांगी विकास व्हावा म्हणुन केंद्र व राज्य सरकारने धरती आबा आवास योजनेंतर्गत रावेर तालुक्यात 18 गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये तापी नदी किनार पट्टयातील पुरी या गावांचा समावेश करण्यात आला असून , या गावाचा सर्वांगी विकास व्हावा म्हणून गावातील सेवा निवृत्त पोलिस अधिकारी सुनिल भाऊ तायडे याच्या संकल्पनेतून गावकऱ्यांनी सेतु सुविधा केंद्राचे निर्माण केले आहे. या सुविधा केंद्राचे उदघाटन माजी जि.प. उपाध्यक्ष नंदुभाऊ माहाजन यांनी केले आहे. या सेतु सुविधा केंद्र अंतर्गत गावातील आदिवाशी बांधवांना आपल्या न्यय हाक्कासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. या गावातील आदिवाशी टोकरे कोळी समाजाच्या लोकांना वेळो वेळी तज्ञांनद्वारे मार्गदर्शन केले जाणार असल्याचे सुनिलभाऊ तायडे यांनी गांवकरीशी बोलतांना सांगितले. शासकिय योजनांचा व अनुदानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहान भाजप अनुसुचित जमातीचे जिल्हाध्यक्ष आदरणिय हरलाल भाऊ कोळी यांनी या कार्यक्रमत केले. तसेच यावेळी श्रीकांत भाऊ माहाजन यांनीही आपले मनोगत व्यक्त केले .आदिवाशांचे दैवत भगवान बिरसा मुंडा यांच्या नावाने आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी ही योजना सुरु केली आहे त्या बद्दल त्यांचे आभार ईश्वर तायडे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. यावेळी पुरी गोलवाडे गावातील असंख्य आदिवाशी बांधव हजर होते. त्यात प्रामुख्याने सावदा मंडळ अध्यक्ष दुर्गादास पाटील , दत्तु गुरुजी , रतिराम तायडे ,ईश्वर तायडे , अरुण तायडे , रमेश माहाराज , संदीप पाटील , नितीन पाटील ,ज्ञानेश्वर कोळी , संजय शिपाई इत्यादींचा समावेश होता.

## देसाईखाडी सुटकेमध्ये महिलेचा मृतदेह ; आरोपी अटकेत

ठाणे : (समर्थ गांवकरी)

काल दुपारी १२.५५ वा. नियंत्रण कक्ष, ठाणे येथुन प्राप्त झालेल्या संदेशानुसार देसाई खाडी पुलाखाली एका बॅगेमध्ये अनोळखी महिलेचा मृतदेह मिळून आला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांचेसह पोलीस पथकाने सदर ठिकाणी भेट देवुन पाहणी केली असता एका २० ते २५ वर्षे वयाच्या महिलेचे प्रेत पाय गुडघ्यात दमडुन ट्रॉली बॅगमध्ये भरलेले व अर्धवट बाहेर आल्याचे दिसत होते. मयत महिलेचे अंगात नेसुस गुलाबी रंगाचा टॉप, त्यावर नक्षीदार फुलांची डिझाईन, त्याखाली लाल रंगाची लेगीन्स घातलेली होती. तिचे डावे हाताचे मनगटाजवळ P.V.S. असे इंग्रजीमध्ये गोंदलेले होते. सदर मयत महिलेचे नातेवाईक किंवा परिचीत मिळून आलेले नाहीत.



त्यावरुन दिनांक २४/११/२०२५ रोजी दुपारी १.१५ वा. पुर्वी कोणीतरी अज्ञात इसमाने अनोळखी महिलेस अज्ञात कारणावरुन कश्याने तरी जिवे ठार मारून प्रेत ट्रॉली बॅगमध्ये भरुन सदर ठिकाणी प्रेत ट्रॉलीबॅगसह पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने देसाई खाडी ब्रिजखाली फेकुन दिलेले असल्याबाबत शिळ डायघर पोलीस ठाण्यात गु. रजि.नं. ९५५/२०२५ भा.न्या. सं. कलम १०३ (१), २३८ प्रमाणे अज्ञात आरोपीताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. मा. वरिष्ठांच्या मागदर्शनाखाली शिळ-डायघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांनी मयताची ओळख पटवून आरोपीचा शोध तपासकामी अधिनस्त अधिकारी / अंमलदार यांचे चार तपास पथके तयार करून गुन्हयाचा तपास चालू असताना सदर गुन्हयाच्या अनुषंगाने सोशल मिडीयावर प्रसारीत केलेल्या बातमीद्वारे एका साक्षीदाराकडून मा. अपर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, ठाणे यांना प्राप्त उपयुक्त माहितीच्या आधारे अज्ञात आरोपीताबाबत सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या माध्यमातुन कसोशीने शोध घेवुन सदर गुन्हयात आरोपीत नामे विनोद श्रीनिवास विश्वकर्मा वय ५० वर्षे रा.ठि. देसाईगाव, ता.जि. ठाणे मुळगाव-गोरखपुर, उत्तरप्रदेश यास देसाई येथून ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास केला असता सदरचा गुन्हा त्यानेच केला असल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्हयातील मयत महिला नामे प्रियांका विश्वकर्मा वय २२ वर्षे ही आरोपीसोबत मागील ०५ वर्षापासुन राहावयास होती. त्याच्यात दिनांक २१/११/२०२५ रोजी रात्रौ आपसात भांडण झाले होते. आरोपीत याने मयत महिलेचा गळा दाबुन खुन करुन पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने तिला ट्रॉली बॅगमध्ये भरुन ०१ दिवस रुममध्येच ठेवले होते.

## कंधारमध्ये भारतीय संविधान दिन साजरा

कंधार : (समर्थ गांवकरी)

भारतीय बौद्ध महासभा ता.शाखा कंधारच्या वतीने बुधवारी, दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी त्रिशरण, पंचशिल ग्रहण करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सुधाकर कांबळे, गंगाप्रसाद यन्नावार, डॉ.दिपक बडवणे, विलास कांबळे, नामदेव कांबळे, आर.एन. गायकवाड, प्रा. राजूरकर, प्रकाश ढवळे, तुकाराम गायकवाड, मधुकर कांबळे, हनमंत डुमणे, प्रल्हाद गायकवाड, प्रेमानंद गायकवाड, निलेश गायकवाड, दिग्वीजयकुमार वाघमारे, वंदना डुमणे, नामदेव जाभाडे, अरविंद बनसोडे, सरलाराणी ढवळे, अ‍ॅड.तथागत वाघमारे, पांडुरंग सोनकांबळे, राजेश्वर कांबळे, रवी कांबळे, संभाजी कांबळे, शेख शादुल, सदाशिव वाघमारे, शुभम संगणवार आदींसह बौद्ध उपासिका व उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समृद्ध पंचायतराज अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

भेंडी, ता. कळवण : (समर्थ गांवकरी)

- ३५० ग्रामस्थांचा सहभाग – स्वच्छता, रस्ते विकास आणि सामुदायिक श्रमदानातून गाव विकासाचा नवा आदर्श

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भेंडी ग्रामपंचायतीने आज (दि. 26 नोव्हेंबर 2025) गाव विकासाचा एकभव्य, प्रेरणादायी आणि आदर्श पायंडा पाडत सामुदायिक शक्तीचे दर्शन घडविले. गावातील तब्बल ३५० ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होत स्वच्छता, रस्ते दुरुस्ती आणि सामुदायिक कामांच्या माध्यमातून आत्मनिर्भर ग्रामविकासाचे उत्तम उदाहरण घालून दिले. विद्यार्थ्यांचाही सक्रिय सहभाग किड्स लर्निंग स्कूल व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भेंडी येथील विद्यार्थी उपस्थित राहून स्वच्छता अभियानात सहभागी झाले. “सरकारी योजनांवर अवलंबून न राहता गाव स्वतःच्या विकासाची जबाबदारी घेतो” हा संदेश विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला. मूलभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात श्रमदान अभियानांतर्गत चार जेसीबी व ट्रॅक्टरच्या मदतीने रस्त्यांची कामे २४ पांदन रस्त्यांची दुरुस्ती व सफाई खंडेराव महाराज व चिंतामणी महाराज स्मशानभूमी परिसरात स्वच्छता व सुधारणा एकलव्य नगर – भेंडी येथे श्रमदानातून रस्ते तयार या सर्व कामांची मोठ्या निष्ठेने अंमलबजावणी झाली. लोकसहभागातून दोन लाखांची आर्थिक मदत ग्रामपंचायतीस लोकसहभागातून तब्बल २ लाख रुपयांचा निधी देऊन ग्रामस्थांनी भेंडीच्या विकासाची भक्कम पायाभरणी केली.

उपस्थित मान्यवर व ग्रामस्थअभियानावेळी सरपंच किशोर ठाकरे, उपसरपंच विजय रौंदळ, ग्रामपंचायत अधिकारी राजाराम खांडवी, माजी उपसरपंच योगेश रौंदळ, सदस्य शांताराम वाघ, गायत्री पवार, सिंधुबाई साळवे, माजी उपसरपंच व शेतकरी तालुका संघटना अध्यक्ष विलास रौंदळ हे मान्यवर उपस्थित होते.

## आळंदीत संविधान दिनी संविधान उद्देशिकेचे लोकार्पण

- संविधान उद्देशिकेचे वारकरी, भाविक, नागरिकांना वाटप

आळंदी : (समर्थ गांवकरी)



आळंदी जनहित फॉउंडेशन, भारतीय बौद्ध महासभा, स्व. राजीव गांधी प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड, संदेश नवले सोशल फाउंडेशन, आळंदी ग्रामस्थ यांचे वतीने आळंदी पंचक्रोशीतील संविधान प्रेमी नागरिक यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिना निमित्त संविधान उद्देशिका कोनशिला पूजन, लोकार्पण, संविधान उद्देशिकेचे वारकरी, भाविक, नागरिकांना वाटप, उद्देशिकेचे वाचन आणि मान्यवरांची मनोगते अशा विविध उपक्रमांनी संविधान दिनी जनजागृती करत संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी संत साहित्याचे अभ्यासक विश्वकर्मा महाराज पांचाळ, जेष्ठ कीर्तनकार तुकाराम महाराज ताजणे, मुख्य संयोजक आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, सचिव रामदास दाभाडे, कैवल्य टोपे, विश्वभर शिंदे, पत्रकार गौतम पाटोळे यांच्या सह विविध संघटनेचे पदाधिकारी, नागरिक, भाविक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करीत उद्देशिकेच्या कॉन्शिल्स पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तुकाराम महाराज ताजणे, विश्वकर्मा महाराज पांचाळ यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करुन कोनशिलेचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात करीत उपस्थित भाविक, नागरिक, वारकरी यांना इंद्रायणी नदी घाटावर संविधान उद्देशिकेचे वाटप करीत जनजागृती करण्यात आली. या प्रसंगी भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्याचा गौरव करीत जीवन चरित्रावर तुकाराम महाराज ताजणे, विश्वकर्मा महाराज पांचाळ यांनी मनोगते व्यक्त करीत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी आळंदी जनहित फॉउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, स्व. राजीव गांधी प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड अध्यक्ष संदेश नवले, पिंपरी चिंचवड शहर संदेश नवले सोशल फाउंडेशन अध्यक्ष प्रतीक नवले, विश्वम्भर शिंदे यांनी परिश्रम घेतले. आभार अर्जुन मेदनकर यांनी मानले.

तक्षशिला बुद्ध विहार येथे संविधान दिना निमित्त उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीस दीप प्रज्वलन करण्यात आले. बुद्ध वंदना आणि त्रिशरण पंचशील पठण झाले. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

# आदिवासी हृदयसम्राट स्व. मधुकरराव पिचड साहेब

**संघर्ष, विकास आणि नेतृत्वाची अमर कहाणी : आदिवासी हृदयसम्राट स्व. मधुकरराव काशिनाथराव पिचड साहेब यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्ताने विनम्र अभिवादन!**

(समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राच्या राजकारणात, सामाजिक कार्यात आणि आदिवासी समाजाच्या विकासात अमिट छाप सोडणारे नाव म्हणजे माजी मंत्री, आदरणीय स्व. मधुकररावजी पिचड साहेब. दूरदृष्टी, लोकाभिमुख कार्यपद्धती, संघर्षशील वृत्ती आणि सर्व समाजाला न्याय देण्याची जिद्द या गुणांमुळे ते ‘आदिवासी हृदय सम्राट’ म्हणून लोकांच्या मनात कोरले गेले.

जीवनप्रवास : साधेपणातून नेतृत्वाकडे : स्व. मधुकरराव पिचड यांचा जन्म १ जून १९४१ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील राजूर येथे महादेव कोळी या आदिवासी समाजातील परिवारात झाला. वडील काशिनाथ पिचड शिक्षक, तर आई कमलबाई गृहिणी—घराची परिस्थिती साधी, पण संस्कार महान. शिक्षणाची ओढ आणि स्वावलंबनाची वृत्ती यामुळे त्यांनी फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे



**लेखन : डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

बीए व एलएलबी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. याच विद्यार्थी जीवनात त्यांनी समाजकार्यात आणि राजकारणात पहिले पाऊल टाकले.

राजकीय कारकिर्द : ७ वेळा आमदार, ४ वेळा कॅबिनेट मंत्री:

१९७२ मध्ये जिल्हा परिषद सदस्य म्हणून सुरुवात केल्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. पुढील ४० वर्षांहून अधिक काळ त्यांनी अकोले मतदारसंघाची सेवा केली.

विधानसभा कामकाज
(१९८० – २००९)
१९८० – काँग्रेस (I)
१९८५ – काँग्रेस
१९९० – काँग्रेस
१९९५ – काँग्रेस
१९९९ – राष्ट्रवादी काँग्रेस
२००४ – राष्ट्रवादी काँग्रेस
२००९ – राष्ट्रवादी काँग्रेस

सलग सात वेळा निवडून येणे ही त्यांच्या लोकप्रियतेची आणि विकासकार्यातील निष्ठेची साक्ष देणारी गोष्ट आहे.

१९९५ ते १९९९ या काळात त्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून काम पाहिले. सरकारला धारदार प्रश्न विचारणे, जनतेचा आवाज बुलंद करणे आणि प्रखर नेतृत्व दाखविणे हे त्यांच्या भूमिकेचे वैशिष्ट्य.

महत्त्वाची मंत्रीपदे :
आदिवासी विकास मंत्री
(१९९१–१९९२,१९९३ –१९९५, १९९९–२००३, २०१३–२०१४)

आदिवासी विकासाची सखोल समज, आदिवासी शिक्षण, आरोग्य, निवास, पायाभूत सुविधा—प्रत्येक क्षेत्रात भरीव काम.

दुग्धविकास, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, पर्यटन विकास:

काही काळ त्यांनी एकाच वेळी अनेक मंत्रालयांचे नेतृत्व केले आणि राज्यातील ग्रामीण व आदिवासी विभागाला बळ दिले.

मूलभूत विकासकामांचे शिल्पकार: १९६१ – अमृतसागर सहकारी दूध संघाची स्थापना. ग्रामीण भागातील पशुपालकांना स्थैर्य देणारा हा त्यांचा पहिला मोठा उपक्रम. अगस्ती सहकारी साखर कारखाना – भारतातील पहिला आदिवासी सहकारी कारखाना.

१९९३ मध्ये स्थापन झालेला हा कारखाना त्यांच्या नेतृत्व, दूरदृष्टी आणि संघटनकौशल्याचा अद्वितीय नमुना आहे. आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्यभर समर्पित!

स्व. पिचड साहेबांनी आयुष्यभर आदिवासी समाजाच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि राजकीय सक्षमीकरणासाठी काम केले.

त्यांच्या प्रयत्नांमुळे : आदिवासी मुलींच्या निवास व्यवस्थांमध्ये वाढ.

आश्रमशाळांचा विकास.

रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांचा विस्तार.

शिकवणी केंद्रे, वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना अधिक प्रभावी.

त्यांच्या कामामुळे अकोले तालुका राज्याच्या नकाशावर एक आदर्श आदिवासी विकास मॉडेल ठरला.

लोकनायक, विकासपुरुष, आदिवासींचे आधारस्तंभ!

साधी भाषा, जमिनीवरचे नेतृत्व, शिष्टाचार, स्नेह आणि कर्तव्यभावना—या सर्व गुणांमुळे ते लोकांच्या मनात अविस्मरणीय ठरले.

ते फक्त राजकारणी नव्हते—

ते मार्गदर्शक, रचनाकार, संघर्षवीर आणि आदिवासी हृदयांचे खरे राजा होते.

निधन आणि अमर वारसा: ६ डिसेंबर २०२४ रोजी, वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. पण त्यांचा वारसा आजही:

प्रत्येक विकासकामात.

प्रत्येक सहकारी संस्थेत.

प्रत्येक आदिवासी कुटुंबाच्या मनात.

अकोले तालुक्याच्या प्रत्येक पाऊलवाटेवर. जिवंत आहे.

प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने विनम्र अभिवादन! स्व. मधुकरराव पिचड साहेबांचे कार्य महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

त्यांना शतशः विनम्र अभिवादन! त्यांचे विचार, कार्य आणि प्रेरणा पुढील पिढ्यांना सदैव दिशा देत राहोत.

# अकोल्याचे भाग्यविधाते

(समर्थ गांवकरी)



अकोल्याचे भाग्यविधाते माजी आदिवासी विकास मंत्री आदरणीय मधुकरराव पिचड साहेब यांचे दुःखद निधन. त्यांचे दुःखद निधन अकोलेकरांच्या मनाला खूप वेदना देणारे आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्राची खूप मोठी हानी झाली आहे. राजकारणात प्रवेश केल्यापासून ते शेवटपर्यंत आपले आयुष्य जनतेच्या सेवेसाठी साहेबांनी खर्च केले. साहेबांचे कार्यकर्तृत्व खूप मोठे आहे.

जन्म दिनांक-१ जून 1941

शालेय शिक्षण-राजुर, माध्यमिक शिक्षण-संगमनेर आणि पदवीपर्यंत शिक्षण-फर्ग्युसन महाविद्यालय पुणे (1962 साली B.A.)

विद्यार्थी दशे मध्ये चांगले शिक्षक मिळणे हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने नशिबाचा भाग असतो. पुणे येथे शिकत असताना थोर विचारवंत व स्वातंत्र्यसैनिक प्रा. ग.

प्र. प्रधान सर यांच्याशी साहेबांचा संपर्क आला. त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन, सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करावे म्हणून प्रोत्साहन मिळाले.

ग्रॅज्युएट झाल्यानंतर त्यांना नोकरी सहज मिळाली असती परंतु नोकरीच्या फंदात न पडता सार्वजनिक जीवनात काम करण्यासाठी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला, महाविद्यालयात असतानाच समाजकारणास सुरुवात. पूर्वी अकोले तालुक्यात कम्युनिस्टांचे वर्चस्व होते, अशा पार्श्वभूमीवर काँग्रेसची पाळंमुळं रोवण्यात महत्वाची भूमिका साहेबांनी बजावली.

**साहेबांचा राजकीय प्रवास**

1) 1972-जिल्हा परिषद सदस्य.
2) 1972 ते 1980 अकोले तालुका पंचायत समिती सभापती म्हणून काम.
3) 1980 साली विधानसभेवर निवडून आले व आमदार झाले.
4) 1980 ते 1985 विधानसभा अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रमुख म्हणून काम केले.
5) जून 1985 ते 1986 महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री पद, 27 जून 1988 ते 12 मार्च 1990 कृषी, रो.हमी योजना, आदिवासी विकास, दुग्धविकास पशुसंवर्धन खात्याचे राज्यमंत्री.
6) 28 जून 1991 ते नोव्हेंबर 1996 आदिवासी विकास, वन व पर्यावरण खात्याचे कॅबिनेट मंत्री.
7) 1993 मध्ये अगस्ती सहकारी साखर कारखान्याची स्थापना.
8) 25 मार्च ते 25 जुलै 1999 विधानसभा विरोधी पक्षनेते.
9) 7 ऑक्टोबर 2001 रोजी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेवर राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणून निवड.
10) 19 ऑगस्ट ते ऑक्टोबर 2004, आदिवासी विकास खात्याचे कॅबिनेट मंत्री.
11) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष म्हणून काम.
12) 11 जून 2013, आदिवासी विकास खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून निवड.
13) 35 वर्ष अकोले तालुक्याचे आमदार.
14) भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते.

**मा. मधुकरराव पिचड साहेब यांच्या कार्यकाळातील महत्त्वाची कामे**

1) आदिवासी विकास महामंडळाची स्थापना.
2) आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा 1976.
3) शबरी वित्तीय महामंडळाची स्थापना.
4) न्यू बजेट योजनेची पुनर्रचना.
5) आदिवासींसाठी 100 % अनुदानावर लिफ्ट पाणीपुरवठा योजना.
6) डोंगराळ प्रदेशातील आदिवासी प्रादेशिक नळ योजना व खडकातील पाणीसाठा टँक ची योजना.
7) खोट्या आदिवासींच्या घुसखोरीला प्रतिबंध.
8) सुप्रीम कोर्टात आदिवासींच्या हक्कासाठी व संरक्षणासाठी लढा.
9) आश्रम शाळेतून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय.
10) अगस्ती सहकारी साखर कारखान्याची निर्मिती.
11) निळवंडे धरण व अकोले तालुक्यात अनेक छोटे-मोठे बंधाऱ्यांचे कामे पूर्ण.

तालुक्यातील जनतेचे सर्वांगीण कोटकल्याण करण्याचा वसा साहेबांनी घेतला होता. राजा प्रजेचा उपभोगशून्य स्वामी असतो या न्यायाने अहोरात्र जनहितार्थ आपले आयुष्य खर्ची केले. रात्रंदिवस जनतेच्या कामासाठी आयुष्य व्यथित केले. अकोले तालुक्यातील रयतेसाठी साहेबांनी रस्ते, पाणी, वीज, उद्योगधंदे, शिक्षण, पर्यटन, रोजगार निर्मिती, तिर्थ क्षेत्र विकास, पूलांची निर्मिती, आरोग्य सेवा, शेती, वृक्षारोपण आदी माध्यमातून अकोले तालुक्यात सर्वकष परिवर्तन घडवून आणले.

आदरणीय पिचड साहेबांनी कोणत्याही पदाची, मानपानाची अपेक्षा न ठेवता अत्यंत निरलसपणे समाजसेवेचे व्रत अंगिकारले होते. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची त्यांची पद्धत त्यामुळेच ते लोकप्रिय नेते ठरले आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी सहमती दाखविणे हा साहेबांचा खास गुण होता. एखादा विरोधक काही काम घेऊन आल्यावर पिचड साहेबांनी त्याचे काम केले नाही असे कधी घडले नाही. हेच त्यांच्या नेतृत्वाचे फार मोठे गुणवैशिष्ट होते. सत्तेत किंवा विरोधी पक्षात असले तरी त्यांची लोकप्रियता कायमच असल्याचे आपण सर्वांनी अनुभवले आहे.

पिचड साहेब अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त होते. महाराष्ट्रामध्ये अनेक शिक्षण सम्राट निर्माण झालेले आहेत. साहेबांनी ठरवलं असतं तर त्यांची स्वतःची शिक्षण संस्था अकोले तालुक्यामध्ये उभी राहिली असती व ते ही शिक्षण सम्राट झाले असते. परंतु त्यांनी तसे न करता अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी

ही तालुक्याची मातृसंस्था म्हणून मोठी करण्यासाठी खूप मोलाचे योगदान दिले आहे. त्याचा परिपाक म्हणून सर्वपक्षीय मॅनेजमेंट असतानासुद्धा अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी चा विस्तार संपूर्ण तालुक्यामध्ये झालेला आहे. त्यामुळे अकोले तालुक्यातील गोरगरीब, आदिवासी विद्यार्थी तालुक्यातच शिक्षण घेत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांच्या शैक्षणिक कामाची दखल घेऊन त्यांना जीवन साधना पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे

आज त्यांच्या जाण्याने अकोले तालुक्यात त्यांनी केलेल्या कार्याला सलाम करतो. संत कोंडाजी बाबा कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, आजी-माजी विद्यार्थ्यांतर्फे प्रथम पुण्यस्मरणानिमित्त स्वर्गीय मधुकररावजी पिचड साहेबांच्या पावन स्मृतींस विनम्र अभिवादन....

काळाचा महिमा काळच जाणे
कठीण तुमचे अचानक जाणे,
आजही घुमतो स्वर तुमचा
कानी, वाहताना श्रद्धांजली
डोळ्यात येते पाणी.

**- इंजी गौरव फटांगरे , संचालक- माधुरी इन्फ्रा प्रा.लिमिटेड.**

# आदिवासी हक्कांचे लढवय्ये

## तडफदार आंदोलनकर्ता मधुकरराव पिचड साहेब!

(समर्थ गांवकरी)



**लेखन : डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

अकोले तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी, शेतकरी आणि कष्टकरी जनतेचा खरा 'आवाज' बनलेले ज्येष्ठ नेते स्व. मधुकर काशिनाथराव पिचड साहेब हे केवळ राजकारणी नव्हते, तर लोकहितासाठी अखंड संघर्ष करणारे तडफदार आंदोलक होते.

त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने त्यांच्या संघर्षमय जीवनकार्याचा मागोवा—

**आंदोलनातून उभे राहिलेले नेतृत्व:** १९६१ मध्ये युवा वयातच त्यांनी आदिवासी शोषणाविरुद्ध आवाज उठवला. जंगलात, घाटमाथ्यावर, धरण प्रकल्पांवर, शेती जमिनीवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी चळवळी उभारल्या.

"आदिवासीला न्याय मिळालाच पाहिजे!" या ठाम विचारातून त्यांनी अनेक वेळा सरकारला जागे केले.

धरणग्रस्तांचे पुनर्वसन, वनहक्क, रेशनिंग व्यवस्था, दुर्गम भागातील आरोग्य-शिक्षणाच्या सुविधा या प्रश्नांसाठी त्यांनी रस्त्यावर उतरून लढे दिले. त्यांच्या नेतृत्वात अकोले तालुक्यात अनेक ऐतिहासिक आंदोलनं झाली ज्यांनी सरकारला निर्णय घ्यायला भाग पाडले.

पक्ष बदलला, पण झुकाव कधीच बदलला नाही!

मधुकरराव पिचड साहेबांनी दीर्घ कारकिर्दीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि नंतर भाजप अशा विविध पक्षांत काम केले.

**पण राजकीय व्यासपीठ कोणतेही असो :** त्यांचे निष्ठास्थान नेहमीच आदिवासी, शेतकरी आणि कष्टकरी समाजच राहिले.

मतदारसंघापुरते राजकारण न करता त्यांनी संपूर्ण राज्यातील आदिवासी समाजाला एकत्र आणण्यासाठी, त्यांना सामर्थ्य देण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या संपर्कात आलेला प्रत्येक कार्यकर्ता म्हणत असे— "पिचड साहेब पक्षाचे नव्हे, लोकांचे नेते आहेत."

**आदिवासी हक्क चळवळींना नवा चेहरा :** त्यांच्या प्रयत्नांनी दुर्गम भागात शाळा, रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सोयी पोहोचल्या.

वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी केलेला दबाव, सहकार चळवळीत केलेले बदल, आश्रमशाळांचे उन्नतीकरण—या सर्वांची पावले त्यांच्या नेतृत्वाखाली मजबूत होत गेली.

अनेक आदिवासी कार्यकर्ते आणि तरुणांना त्यांनी राजकारणाची व समाजसेवेची प्रेरणा दिली. त्यांच्या मार्गदर्शनातून उभे राहिलेले कार्यकर्ते आज विविध क्षेत्रात काम करत आहेत.

**अखेरपर्यंत समाजकार्यात गुंतलेला नेता :** वयोमान वाढले तरी त्यांचे आंदोलनकर्त्याचे रक्त कमी झाले नाही. शेवटच्या काळातही ते आदिवासींच्या समस्या, वनहक्क, रोजगार, पाण्याच्या अडचणी यावर सरकारपुढे ठामपणे उभे राहत होते.

त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील आदिवासी आंदोलनाला शक्ती देणारा एक स्तंभ कोसळला.

समाजासाठीची त्यांची ओळख अमर : त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमानिमित्ताने आपण एक अशा नेत्यास नमन करतो—

ज्याने राजकारणाच्या पलिकडे जाऊन आयुष्यभर जनतेसाठी लढा दिला.

त्यांच्या संघर्षांनी आदिवासी समाजाला नवजीवन दिले, आत्मविश्वास दिला आणि संघटनशक्ती वाढवली.

त्यांच्या कार्यातून मिळणारी प्रेरणा आजही असंख्य कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत आहे.

स्व. मधुकरराव पिचड साहेबांना प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने विनम्र अभिवादन.

त्यांच्या समाजकार्यातून प्रेरणा घेऊ या आणि लोकसेवेचे आदर्श पुढे नेऊया.





आदिवासी उन्नती सेवा मंडळ, राजूर
ता.अकोले, जि.अहमदनगर

संस्थापक विश्वस्त : स्व. मधुकरराव पिचड
विश्वस्त : मा.आ.वैभवराव पिचड


अध्यक्ष : श्री.भरत नामदेव घाणे
सचिव : श्री.एम.एम.भवारी


– संचालक –
श्री.विठ्ठल तबाजी भवारी, श्री.माधव भाऊ गभाले,
श्री.भरत रामजी घोरपडे, श्री.पांडुरंग आनंदा खाडे, श्री.गणपत शंकर भांगरे,
श्री.सुनिल महादु सारोक्ते, श्री.मारुती यशवंत मेचकर, श्री.चिंधु भाऊ भांगरे

आदिवासी उन्नती मंडळ संचलित...

प्राथ. व माध्य.व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, मान्हेरे
मुख्याध्यापक
श्री.बोऱ्हाडे एस.टी. (प्राथ)
श्री.पिचड डी.आर.(माध्य))
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

प्राथमिक आश्रमशाळा,राजुर
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री.शिरीष पाबळे (प्राथ)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, देवठाण
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री. प्रभाकर कारभारी येलमामे (प्राथ)
श्री.भांगरे एस.एम.(माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, एकदरे
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री.नेहे पी.बी. (प्राथ)
श्री.आरोटे डी.व्ही.(माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

प्राथ व माध्यमिक आश्रमशाळा, कोथळे
ता.अकोले, जि.अहमदनगर
सौ. घोडके मंजुषा बबन (प्राथ)
श्री. सुदाम सदगीर (माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, शेंडी
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री. तातळे एम. एल. (प्राथ)
श्री. शिवराम कोंढार (माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा,खडकी
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्रीम. मिनाक्षी पाटील (प्राथ)
श्री. अशोक भालेराव (माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

आदिवासी उन्नती सेवा मंडळ कर्मचारी पतसंस्था; राजूर
चेअरमन : श्री.सुधीर कानवडे
व्हा.चेअरमन :श्री.रामदास बांबळे
सचिव : श्री.संजय कडलग
सन्मा.संचालक मंडळ

मा.मधुकरराव पिचड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजूर
ता.अकोले, जि.अहमदनगर
प्रा. श्री. खाडे आर. डी.
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वारंघुशी
ता.अकोले, जि.अहमदनगर
श्री. दत्तात्रय एम. देशमुख
मुख्याध्यापक
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

माध्यमिक आश्रमशाळा, चिंचावणे
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री. कैलास गेणुजी तेलोरे
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी




## मा. आदिवासी मंत्री
## अकोले तालुक्याचे जलनायक
# वंदनीय स्व. मधुकरराव पिचड साहेब

यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त

# विनम्र अभिवादन!

**शोकाकुल-**

आमची खालील दर्जेदार, शुद्ध व सकस उत्पादने 'अगस्ति' ब्रॅण्डनेमने सर्वदूर विक्रीस उपलब्ध आहेत.




**मा.श्री.वैभवराव पिचड** (चेअरमन)

**मा.श्री.रावसाहेब रामराव वाकचौरे** (व्हा.चेअरमन)

**मा.श्री.दादाभाऊ गणपत सावंत** (कार्यकारी संचालक)

**सन्माननीय संचालक मंडळ**

श्री.आनंदराव वाकचौरे, श्री.आप्पासाहेब आवारी, श्री.रामदास आंबरे, श्री.जगनशेठ देशमुख, श्री.अरुण गायकर, श्री.गंगाधर नाईकवाडी, **श्री. शिवाजी गायकर,** श्री.सुभाष डोंगरे, श्री.बाबुराव बेणके, श्री.गोरक्ष मालुंजकर, श्री.शरदराव चौधरी, सौ.अश्विनी धुमाळ, सौ.सुलोचना औटी

**श्री. दयानंद वैद्य, श्री. बाळासाहेब मुंढे (स्विकृत संचालक)**

गायीचे शुद्ध व सकस अगस्ति तूप ● निर्भळ, निर्जंतुक, पाश्चराईज अगस्ति दूध ● दही ● लस्सी ● ताक ● श्रीखंड ● आम्रखंड ● पेढा ● खवा ● मलई ● पनीर

## अमृतसागर सहकारी दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या; अकोले

---



साहसे श्री: प्रतिवसति ।

# अकोले तालुका एज्यु. सोसायटी

ता. अकोले, जि. अहिल्यानगर



मा. आदिवासी मंत्री, जलनायक तसेच अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त

# स्व. मधुकरराव पिचड साहेब

यांच्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन...!

**सन्माननीय विश्वस्त**

श्री. वैभवराव पिचड (कायम विश्वस्त)
श्री. सुरेशराव कोते (स्विकृत विश्वस्त)
श्री. गिरजाजी जाधव (कायम विश्वस्त)
श्री. मधुकरराव सोनवणे (स्विकृत विश्वस्त)
श्री. संपतराव वैद्य (स्विकृत विश्वस्त)

श्री. सुनिल दातीर (अध्यक्ष)
श्री. सुधाकर देशमुख (सेक्रेटरी)
श्री. डॉ. दामोदर सहाणे (सदस्य)
श्रीमती कल्पनाताई सुरपुरिया (सदस्या)
श्री. सुधाकर आरोटे (सदस्य)
श्री. रमेश जगताप (सदस्य)
श्री. धनंजय संत (खजिनदार)
श्री. यशवंत आभाळे (सदस्य)
श्री. अॅड. आनंदराव नवले (सदस्य)
श्री. शरद देशमुख (सदस्य)
श्री. मच्छिंद्र धुमाळ (सदस्य)
श्री. संपत मालुंजकर (शिक्षणाधिकारी)

---



अकोले तालुक्याचे

# जलनायक

## मा.मंत्री मधुकररावजी पिचड साहेब यांना

प्रथम पुण्यस्मरण

विनम्र अभिवादन!

शोकाकुल– जनलक्ष्मी ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या, अकोले
सन्मा. संचालक मंडळ तसेच कर्मचारी वृंद

---

प्रथम पुण्यस्मरण

जेष्ठ नेते

## मधुकररावजी पिचड साहेब

यांना



यांच्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन...!

- शोकाकुल -
**मा. श्री. डी. डी. पळवळे**
कळसुबाई - हरिश्चंद्र अभयारण्य परिक्षेत्र
अकोले वनविभाग, ता. अकोले

---

# जलनायक

प्रथम पुण्यस्मरण

साहेब तुम्ही सदैव आमच्या हृदयात आहात.!



ज्येष्ठ नेते, माजी मंत्री
**मधुकरराव पिचड साहेब**
**प्रथम पुण्यस्मरण**

दुःखांकित

प्रो.प्रा.भारतशेठ पिंगळे
मो. ९४२३४६४६०३
**महाराष्ट्र अल्युमिनियम अँड ग्लास हाऊस**
सारडा पेट्रोल पंपाच्या मागे, अकोले

प्रो.प्रा. रोशन भारत पिंगळे
मो. ८६६८३३३४५२
**पिंगळे अँड सन्स ग्लास कॉर्पोरेशन**
नवलेवाडी फाटा, अकोले

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# गौरी घुमट ते तुळजाभवानी मंदिर कामाचा शुभारंभ

## गौरीघुमट भागातील रस्त्याचे काम होत असल्याने 50 वर्षाचा प्रलंबित प्रश्न सुटला : वसंत लोढा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गौरी घुमट भागात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी जमा होत होते.अनेक वर्षापासून या भागात प्रलंबित असलेला रस्त्याचे काम पूर्णत्वास येत आहे.यासाठी माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या स्थानिक विकास निधी तसेच महानगरपालिकेच्या नगरसेविका सुवर्णाताई गेनाप्पा यांच्या पाठपुराव्यामुळे गौरी घुमट कमान ते तुळजाभवानी मंदिर कॉंक्रिटीकरण



रस्त्याचे काम होत आहे.

या ठिकाणी बंद पाईप गटारीचे काम पूर्ण झाल्याने पावसाळी पाण्याचे जमा होण्याचा प्रश्न मिटला आहे.अनेक वर्षापासून पाठपुराव्याला यश मिळाले आहे.रंगारगल्ली,पटवर्धन चौक,राधाकृष्ण मंदिर येथील रखडलेल्या रस्त्याचे काम महानगरपालिकेने लवकरात लवकर सुरू करावे.अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांनी केले आहे.

गौरी घुमट ते तुळजाभवानी मंदिर कॉंक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचा शुभारंभ भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. याप्रसंगी संतोष गेनाप्पा, बबन आढाव,सामाजिक कार्यकर्ते सागर शिंदे,बाळासाहेब खताडे,माजी नगरसेविका द्वारकाबाई शिंदे,प्रशांत मुथा,सुरेश गांधी, संदीप शिंदे,सुबोध रसाळ,मनोज लोढा,शांतीलाल लोढा,मल्हार शिंदे,दिलीप ओसवाल आदी उपस्थित होते.



नांदेड जिल्हा :“एक पुस्तक शंभर शिक्षकांच्या बरोबरीचे असते आणि एक चांगला शिक्षक संपूर्ण ग्रंथालयाच्या तोलामोलाचा असतो,” अशी व्याख्या आपण ऐकत आलो आहोत. पूर्वी शिक्षकांची अध्यापनशैली देणगीभावाने आणि निष्ठेने परिपूर्ण होती. मात्र काळाच्या ओघात शिक्षणव्यवस्थेमध्ये आणि शिक्षकांच्या भूमिकेमध्ये मोठे बदल झाले आहेत. आजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहता शिक्षकांनी स्वतःकडे अंतर्मुख होण्याची तातडीची गरज आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलाचे माजी संचालक डॉ. बी. पी. बंडगर यांनी केले. ते दि. २२ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या अधीसभा सभागृहात आयोजित कुलगुरू व्याख्यानमाला या कार्यक्रमातील पहिल्या व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते.

## थोडक्यात बातम्या...



### संविधान दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन

नाशिक (स. गांवकरी) : पखाल रोडवरील महात्मा फुले समाज शिक्षण संस्था संचलित मातोश्री सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख अतिथी ॲड. विजय निरभवणे यांच्या हस्ते करीत पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य गजानन घरटे, मुख्याध्यापक सुनील शेवाळे, वरिष्ठ लिपिक कैलास गायकवाड उपस्थित होते. भारतीय संविधान उद्देशिकेतील मूल्यांची जोपासना करून विद्यार्थीदशेत संविधानाचे महत्त्व वाढविणे आवश्यक आहे. धर्मभेद वाढविण्यापेक्षा आपण भारतीय आहोत याचा अभिमान बाळगणे अधिक चांगले व योग्य आहे असे प्रतिपादन ॲड. विजय निरभवणे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य गजानन घरटे तर सूत्रसंचालन गोकुळ माळी व आभार संजय साळवे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### नागोराव विठ्ठलराव धांडे पाटील यांचे निधन

अर्धापूर (स. गांवकरी) : शहरातील अमृतनगर भागातील जेष्ठ नागरिक तथा उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे सेवानिवृत्त कर्मचारी नागोराव विठ्ठलराव धांडे पाटील ( वय ६५ वर्ष)यांचे राहत्या घरी अल्पशा आजाराने दि.२६ बुधवारी रोजी राहत्या घरी स.७ -३० वा. निधन झाले आहे.त्यांच्यावर अर्धापूर येथील स्मशानभूमीत दुपारी ४ वा.अंत्यस्कार करण्यात आले. नागोराव धांडे पाटील यांच्या पाश्चात्य पत्नी,दोन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते वेदांत कॉम्प्युटरचे संचालक संदीप धांडे,संतोष धांडे यांचे वडील होत.

### श्री कुलस्वामी खंडेराया यात्रा उत्सव निमित्त कार्यक्रम व बैलगाड्या शर्यती

शिवनेरी (स. गांवकरी) : कै. माजी खासदार निवृत्तीशेठ शेरकर व चेअरमन कै. सोपानअण्णा शेरकर यांच्या आशीर्वादाने व पेरणेने शिरोली खुर्द येथे श्री कुलस्वामी खंडेराया चंपाषष्ठी यात्रौउत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम व बैलगाड्यांच्या भव्य शर्यती कार्यक्रमासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली . यावेळी भाविकांनी सदानंदाचा येळकोट .... भैरवनाथाचे चांगभले .... अंबाबाईचा उदे उदे... येळकोट येळकोट जय मल्हार... कढीपठार महाराज की जय ..... अशा गर्जना यावेळी देण्यात आल्या. यानिमित्ताने मंगळवार , दि. २५ रोजी श्री कुलस्वामी खंडेराया मूर्ती अभिषेक पहाटे ५ वा.,सकाळी ८ वा.सत्यनारायणाची पूजा,सकाळी ९ वा.ह भ प प्रकाश आव्हाड यांचे कीर्तन ,सकाळी ११ वा.महाप्रसाद,सायंकाळी ६ वा .राम कृष्ण हरी प्रसादिक भजन मंडळ नेतवड व श्रीराम प्रसादिक भजनी मंडळ शिरोली खुर्द यांचा हरी भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला . सटवाई मंदिर येथे बुधवार दिनांक २६ रोजी सकाळी ८ ते सांय . ७ वा .पर्यंत आलेल्या सर्व भाविकांना दोन वडापाव व दोन केळी असे मोरे फिजिओथेरपी मेडिकल इंडिया लि.यांच्या संकल्पनेतून तीन वर्ष मोफत अन्नदान वाटप सुरू आहे. या यात्रेनिमित्त दिनांक २६ व दिनांक २७ रोजी भव्य दिव्य बैलगाडा शर्यती आयोजन करण्यात आले आहे. बैलगाडा शर्यतीमध्ये प्रथम क्रमांक ७७ ,७७७ रू / दुसरा क्रमांक ५५ ,५५५ रु /तिसरा क्रमांक ४४, ४४४ रु /चौथा क्रमांक ३३३३३ रु / असे विविध बक्षीस देण्यात येणार आहे . अशी माहिती ग्रामविकास कमिटी , यात्रा कमिटी व समस्त ग्रामस्थ शिरोली खुर्द यांनी सांगितली आहे .

# अनाथ उज्ज्वलाचा महिला व बाल विकास विभागामार्फत विवाह

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

शासकीय मुलींचे अनुरक्षण गृह नाशिक या शासकीय संस्थेतील प्रवेशिता उज्ज्वला व हर्षल राजेंद्र नागमोती यांचा विवाह आज पार पडला. उज्ज्वला वय वर्ष २२ ही वयाच्या ६ व्या वर्षापासुन शासकीय संस्थेत राहते ती अनुरक्षण गृह येथे २०२१ पासून वास्तव्यास आहे. उज्ज्वला च्या वडिलांच्या मृत्यू नंतर वयाच्या ६ व्या वर्षी मुलींचे बालगृह धुळे येथे प्रवेशिता म्हणुन दाखल केले याच संस्थेत उज्ज्वला लहानची मोठी झाली .वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर उज्ज्वलास शासकीय मुलींचे अनुरक्षण गृह नाशिक या शासकीय संस्थेत शिक्षण व पुनर्वसन साठी दाखल केले. अनुरक्षण गृह नाशिक येथे आल्यानंतर उज्ज्वलाने असिस्टंट



नर्सिंग, फॅशन डिझायनिंग अँड टेक्नॉलॉजी, MS-CIT,ॲडव्हान्स ड्रेस मेकिंग, इमिटेशन व ज्वेलरी मेकिंग हे शिक्षण पूर्ण केले.

शिक्षण पूर्ण झाल्यावर उज्ज्वलाने संस्थे मार्फत विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली.त्या नुसार तिला संस्थे मार्फत अनुरूप जोडीदार शोधण्यास सुरुवात केली. सर्व चौकशी व तपासणी अंती हर्षल राजेंद्र नागमोती यांची निवड करतांना संस्था स्तरावरून अधीक्षिका व कर्मचारी यांनी नागमोती यांचे घरी गृहभेट आणि कामाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली. हर्षल, उज्ज्वला परस्पर पसंतीने तसेच संस्था व नागमोती परिवार या सर्वांच्या सहमतीने,कागदपत्रे पूर्तता, वैद्यकिय सक्षमता तपासणी,चारित्र्य पडताळणी अहवाला, उत्पन्न दाखला, गृहभेट अहवाला या सर्व बाबींच्या पूर्तते नंतर विवाह प्रस्ताव संस्थेने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सादर केला. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयानेही गृहभेट व चौकशी पडताळणी करून विवाह प्रस्ताव विभागीय कार्यालयात मंजुरी साठी सादर करण्यात आला.त्यानुसार विभागीय उप आयुक्त महिला व बाल विकास नाशिक विभाग यांच्या प्रशासकीय मंजुरी नंतर विवाह नियोजित करण्यात आला.

विवाहास नयना गुंडे आयुक्त महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य व आयुष प्रसाद जिल्हाधिकारी नाशिक यांनी वधू वरास पत्राद्वारे दिलेले शुभ संदेश विवाह प्रसंगी वाचून दाखवले.

विवाह प्रसंगी ओंकार पवार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नाशिक,चंद्रशेखर पगारे विभागीय उप आयुक्त महिला व बाल विकास विभाग नाशिक,सुनील दुसाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नाशिक, प्रताप पाटील जिल्हा कार्यक्रम अधिकारी नाशिक, अनिता वाघ उप आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक,सचिन शिंदे बाल विकास प्रकल्प अधिकारी नाशिक ग्रामीण, बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती अध्यक्ष व सदश्य महिला व महिला व बाल विकास मधील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

विवाह प्रसंगी संस्थेच्या अधीक्षिका मंगला भोये - चौधरी आणि आर के चौधरी यांनी चे कन्यादान केले.

# राखीव दिव्यांग निधीतून जागतिक दिव्यांग दिन साजरा करा

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

३ डीसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो या दिवशी समाजात दिव्यांगांकडे बघण्याचा हष्टीकोन बदलावा व समाजात वावरताना दिव्यांगत्वाची जाणिव होऊ न देता सन्मान पुर्वक वागणुक मिळावी हा मुख्य उद्देश आहे, शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या आदेशान्वये सर्व शासकीय निमशासकीय ठिकाणी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याच्या सूचना दिल्या आहेत, नाशिक महानगरपालिका यांनी ही शहरातील दिव्यांगांचा आनंद द्विगुणित व्हावा व त्यांना या दिवशी त्यांचे हक्क व अधिकार अधिनियम यांची माहिती व्हावी व दिव्यांग प्रबोधन पर कार्यक्रमाचे मनपा कडुन आयोजन करण्यात यावे या साठी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ललित पवार व कार्याध्यक्ष बबलु मिर्झा यांनी आयुक्तांना जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यासाठी पत्र दिले आहे, दरवर्षी राखीव ठेवण्यात येणारा दिव्यांग निधी हा पुर्ण खर्च होत नसुन या निधीतून जागतिक दिव्यांग महोत्सव साजरा करावा अशी शहरातील दिव्यांगांची मागणी आहे.

# वीज बिल कमी करण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन माघार

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील सगरोळी व परिसरात विद्युत वितरण कंपनीकडून जबरदस्तीने स्मार्ट मिटर बसविण्यात आले आहे. सदरील स्मार्ट मिटर सुरुवातीच्या दोन महीने कमी रिडींग चालत होता. पण आता तोच मिटर डब्बल रिडींग देत असल्याने घरात दोन फॅन, दोन, बल्फ असणाऱ्या अनेक ग्राहकांना ५५ ,३१,२८ हजार असे एवढ्या मोठ्या रक्कमेच बिल अकारण्यात येत असल्यामुळे सगरोळी व परिसरातील वीज ग्राहकांकडून विद्युत कंपनी विरोधात दि. २६ नोव्हेंबर रोजी सगरोळी येथे आंदोलन पुकारण्यात आले असता संबंधित विभागाकडून आठ



दिवसात बिलाची रक्कम कमी करून देण्याच्या आश्वासनानंतर हे आंदोलन तात्पुर्त्या स्वरूपात माघार घेण्यात आले आहे.

तालुक्यातील विद्युत कंपनीचा भोंगळ कारभार चालत असून वीज ग्राहकांना अव्वाच्या सव्वा बिल अकारल्या जात आहे. याबद्दल वितरण विभागास तक्रारी करण्यात आहे. पण आजतगायत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने मौ. सगरोळी येथील वीज ग्राहकांनी बुधवारी गावात वितरण कंपनीच्या विरोधात आंदोलनाचा करण्याचा पवित्रा घेऊन अधिकाऱ्यासमोर रोष व्यक्त केले.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी विज ग्राहकांचे मिटर तापसानी करुन जास्तीचे येत असलेले विज बिल आठ दिवसात कमी करुन देण्याच्या अश्वासन दिले आहे. त्यानंतर सगरोळी परिवर्तन समीतीच्या वतीने चालु असलेले आंदोलन सद्यस्थीत माघार घेतले आहे.यावेळी शंकर महाजन,शिवकुमार बाबणे,प्रभु मुत्तेपोड,बाबु उस्केलवार,सुनिल खिरप्पावार,राजु बामने, शेख मुर्तुज,सचिन कल्लोड,आदिनाथ बाबणे,बाबु पिंजारी,बसस्वेश्वर मुगळे,पांडुरग इबीतवार,विजय शिंदे,वैभव भोसले, संजय पद्‌मवार,कोंडलाडे नागोरावसह शेकडो नागरीक उपस्थीत होते.यानंतर विज ग्राहकास विद्युत विभागाकडुन आर्थिक पिळवणूक न थांबल्यास पुढील काळत या पेक्षाही तिव्र जनआंदोलन करण्याचा ईशारा सगरोळी परिवर्तन समीतीकडुन देण्यात आला आहे.

# जिल्हा परिषदेत संविधान दिन उत्साहात साजरा; नागरी शिस्त ही सामूहिक जबाबदारी- भार्गवी मुंढे

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नागरी शिस्त राखण्याची जबाबदारी ही व्यक्ती, संस्था आणि प्रशासन या तिघांचीही संयुक्त आहे. सामूहिक जबाबदारीनेच समाज प्रगतिपथावर चालू शकतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे यांनी केले. नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने आज यशवंतराव चव्हाण सभागृहात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्य



कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नियोजन शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, लेखाधिकारी निळकंठ पाचंगे, उपशिक्षणाधिकारी अवधूत गुंजेवार आदींची उपस्थिती होती. मुंढे यांनी विविध राज्यांचे उदाहरण देत नागरी शिस्त व संविधानिक मूल्यांवर विवेचन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गाने सामूहिक जबाबदारी स्विकारली तर विकासाचा मार्ग सर्वांसाठी प्रशस्त होतो, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी केले. त्यांनी संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत घर-घर संविधान उपक्रमांतर्गत प्रत्येक घरापर्यंत संविधान उद्देशिका पोहोचविण्यात येणार असल्याची माहिती दिली. प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सभागृहातील सर्वांनी भारताच्या संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे यांनी केले. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे कर्मचारी रणजीत गजभारे यांच्या वतीने लाडूंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवार, शशिकांत गोले, गंगाधर माचनवाड, विजय वाघमारे, रणजीत गजभारे, सोपान खिल्लारे, राजेश जोंधळे, साईचरण मुगावे, शिवसांब चेट्टू, गजेंद्र श्रीरामवार, कुलदीप जोशी, बालाजी आवर्दे उज्ज्वला गजभारे, शालिनी शेळके, प्रतिभा चोळाखेकर, वैशाली थोरात, मोहिनी जाधव, स्नेहल वळसे, पूजा सोनटक्के, सुरज नाईक, राजेश तावडे, अशोक पंडित आदींसह जिल्हा परिषदेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘आसा मी अशी मी’चा ट्रेलर प्रदर्शित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मराठी प्रेक्षकांची उत्सुकता ताणून धरणारा अमोल शेटगे दिग्दर्शित, सचिन नाहर आणि अमोग मलाविया निर्मित ‘आसा मी अशी मी’चा भव्य ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. लंडनच्या मोहक लोकेशन्समध्ये घडणारी ही प्रेमकहाणी ग्लॅमर आणि भावनिक वळणांनी सजलेली आहे. ‘आसा मी अशी मी’ चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला असून या ट्रेलर ने एका प्रेमकथेला आंतरराष्ट्रीय उंची दिली आहे. यूकेमधील भव्य लोकेशन्स, आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान, आलिशान प्रॉडक्शन व्हॅल्यू आणि मनाला भिडणारा रोमँस. या सर्वांचा मिलाफ असलेला हा चित्रपट निर्माता सचिन नाहर आणि अमोग मलाविया



यांच्या मोठ्या दृष्टीकोनाची झलक दाखवतो. या ट्रेलर मध्ये आपण पाहू शकतो अभिनेते अजिंक्य रमेश देव एक भारतीय फोटोग्राफरच्या भूमिकेत आहेत. देखणा, स्टायलिश आणि थोडासा कॅसानोव्हा स्वभावाचा. त्यांचं व्यक्तिमत्त्व एकदम मोकळं, धडाडीचं आणि जीवनाचा पुरेपूर आनंद घेणारं दाखवलं आहे. तर दुसरीकडे अभिनेत्री तेजश्री प्रधान एक परिपक्व, स्थिर आणि स्वतःच्या स्वप्नांनी भरलेली मुलगी म्हणून दिसते जी लंडनमध्ये स्वतःची ट्रॅव्हल एजन्सी चालवते. लंडनच्या चमचमणाऱ्या लोकेशन्समुळे त्यांच्या प्रेमाची प्रत्येक फ्रेम अधिकच उठून दिसते. मराठी सिनेमात पहिल्यांदाच इतक्या ग्रँड स्केलवर चित्रिकरण झाले असून, रोल्स रॉयसची लक्झरी, प्रसिद्ध हेरिटेज लोकेशन असलेला हार्टलेबरी कॅसलचे राजेशाही वैभव आणि इतर अप्रतिम लोकेशन्समुळे प्रत्येक फ्रेमला भन्नाट आंतरराष्ट्रीय भव्यता लाभली आहे.

विशेष बाब म्हणजे चित्रपटाचा ग्रँड प्रीमियर गोवा फिल्म फेस्टिव्हलमध्ये करण्यात आला असून, ज्यूरी आणि प्रेक्षकांकडून त्याला विशेष दाद मिळाली.

ट्रेलर मध्ये हि प्रेमकहाणी जिथे सुंदर उंची गाठते, तिथेच एक अनपेक्षित वळण दिसतं. तेजश्री अचानक अजिंक्यपासून दूर जाताना दिसते.



# संशयास्पद मतदार



## संपादकीय

'संशयास्पद मतदार'ही श्रेणी असलेले आसाम हे देशातील एकमेव राज्य आहे. १९९७ मध्ये निवडणूक आयोगाने सुमारे तीन लाख मतदारांना 'डी' चिन्ह दिले होते, कारण त्यांची नागरिकत्वाची कागदपत्रे संशयास्पद होती. आता तिथे मतदारांची विशेष पडताळणी होणार आहे. आसाममध्ये संशयास्पद मतदारांविरुद्ध सुमारे पाच दशकांपासून लढा सुरू आहे. सध्या आसाममध्ये असे ९६,९८७ मतदार आहेत. आसामच्या एकूण मतदारसंख्येच्या (सुमारे २.४ कोटी) ते प्रमाण ०.४ टक्के आहे. मात्र, हे प्रमाण राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे आहे, कारण हे लोक बहुतेक बंगाली-मुस्लिम समुदायातील आहेत. आसाम आंदोलन आणि त्यानंतरच्या घटनांचा आसामी समाजावर कायमचा परिणाम झाला आहे आणि बेकायदा स्थलांतराचा मुद्दा तणावाचा स्रोत राहिला आहे. 'ऑल आसाम स्टुडंट्स युनियन' (AASU) आणि आसाम गण परिषद या दोन संघटनांच्या नेतृत्वाखालील आसाम आंदोलन हे बांगलादेशातून येणाऱ्या बेकायदा स्थलांतराविरोधात होते. या स्थलांतरामुळे स्थानिक आसामी लोकांचे राजकीय आणि लोकसंख्याशास्त्रीय अधिकार कमकुवत होतील, अशी भीती या गटाला होती. त्यांचे लक्ष बांगलादेशातून येणाऱ्या स्थलांतरितांवर असले तरी, त्यांची बंगालीविरोधी भावना आसाममध्ये राहणाऱ्या भारतीय आणि बांगलादेशी बंगाली दोघांमध्येही पसरली. १९७९ ते १९८५ पर्यंत चाललेली ही चळवळ आसामी राष्ट्रवादी इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग होती आणि अलीकडील राजकारणात अजूनही वादाचा मुद्दा आहे. पुढे याच दोन संघटनांचं विलीनीकरण होऊन आसाम गण परिषद हा क्षेत्रीय पक्ष अस्तित्वात आला. प्रफुल्लकुमार महंत मुख्यमंत्री, तर भृगुकुमार फुकन गृहमंत्री बनले. या पक्षाचे आसाममध्ये दहा वर्षे राज्य होते. ही चळवळ १९८५च्या आसाम करारानंतर संपली आणि बेकायदा स्थलांतराला तोंड देण्यासाठी परदेशी न्यायाधिकरणांची स्थापना झाली आणि राजकीय प्रक्रियेत



'आसू'चा समावेश करण्यात आला. १९८५ च्या आसाम करारानुसार, २४ मार्च १९७१ नंतर बेकायदा आलेल्या व्यक्तींना परदेशी मानले जाते. आसाममध्ये दाखल झालेल्या सर्व बेकायदा स्थलांतरितांना शोधून त्यांना हद्दपार करण्याची प्राथमिक मागणी होती. बेकायदा स्थलांतर आणि आसामी लोकसंख्येवर त्याचे नकारात्मक परिणाम होत असल्याच्या चिंतेमुळे हे आंदोलन सुरू झाले होते, परंतु, या चळवळीची मुळे ब्रिटिश वसाहत काळापासून सुरू आहेत. तेव्हा बंगाली हिंदूंना ब्रह्मपुत्रा खोऱ्यात स्थलांतर करण्यास प्रोत्साहित केले जात होते. आजही आसाममध्ये बंगालीविरोधी भावना कायम आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये, 'आसू'ने बेकायदा हिंदू बांगलादेशींवरील खटले मागे घेण्याचा निषेध केला आणि 'सीएए' मधून आसामला वगळण्याची मागणी केली. नेमका इथेच भाजप आणि आसाम गणपरिषद तसेच 'आसू'च्या विचारासरणीत मूलभूत फरक आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | 1 | 9 | 7 | 2 | | |
| 1 | | | | | 3 | | | 4 |
| | | 2 | | 6 | | | | |
| 6 | | 9 | | 7 | 1 | 4 | 3 | |
| | 3 | | | 2 | | | 8 | |
| | 7 | 5 | 3 | 4 | | 1 | | 9 |
| | | | | 1 | | 8 | | |
| 9 | | | 4 | | | | | 6 |
| | | 4 | 7 | 3 | 6 | 5 | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | 9 | 4 | 8 | 7 | 3 | 6 | 2 |
| 7 | 3 | 8 | 6 | 5 | 2 | 9 | 4 | 1 |
| 6 | 4 | 2 | 1 | 3 | 9 | 8 | 5 | 7 |
| 2 | 7 | 5 | 3 | 9 | 8 | 6 | 1 | 4 |
| 4 | 6 | 3 | 7 | 2 | 1 | 5 | 9 | 8 |
| 9 | 8 | 1 | 5 | 4 | 6 | 2 | 7 | 3 |
| 3 | 1 | 7 | 2 | 6 | 5 | 4 | 8 | 9 |
| 8 | 2 | 6 | 9 | 1 | 4 | 7 | 3 | 5 |
| 5 | 9 | 4 | 8 | 7 | 3 | 1 | 2 | 6 |

विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष

ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:सप्तमी
२४:३०:१७+
नक्षत्र:धनिष्ठा
२६:३१:५१+

योग:ध्रुव १२:०८:५०
करण:गर १२:२१:१८
करण:वणिज
२४:३०:१७+
सूर्य:वृश्चिक
चन्द्र:कुम्भ१४:०७:०८

## उपदेशाचे डोस

### नैतिकतेचा आदर्श

आयुर्वेदाचे प्रणेते महर्षी चरक औषधी वनस्पतींच्या शोधात आपल्या शिष्यासह रानावनांत, जंगलात च दऱ्या डोंगरावरुन हिंडत चालले होते. चालता चालता अचानक त्यांची दृष्टी समोर हिरव्यागार शेतात उगवलेल्या एका सुंदर फुलाकडे गेली. आजपर्यंत त्यांनी असे आगळेवेगळे अनुपमेय सुंदर फूल कधी पाहिलेच नव्हते. त्यांना फूल स्वत:जवळ हवेसे वाटू लागले. पण संस्कारामुळे मन तसे करण्यास धजावत नव्हते. मनात चलबिचल होत होती. त्यांची ही अवस्था शिष्याच्या लक्षात आली. शिष्य त्यामना विनम्रपणे म्हणाला, गुरुवर्य आपली आज्ञा झाली तर ते फूल मी आपल्या सेवेस अर्पण करु ? महर्षी चरक म्हणाले, वत्सा ! त्या फुलाची मला निश्चितच गरज आहे. पण या शेताच्या मालकाच्या परवानगीशिवाय ते घेणे म्हणजे चोरी करणे ठरेल. महर्षींच्या या उच्च आदर्शवाद व नैतिकतेपुढे शिष्यांनी मान खाली घातली.ते पुढे म्हणाले, शिष्यांनो, नैतिक जीवन व राजाज्ञा यात कोणतेच साम्य नाही. जर त्याने आपल्या प्रजाजनांची संपत्ती स्वच्छंदपणे व मनमानी करुन स्वत:करता वापरली तर नैतिकतेचा आदर्श तो काय राहणार ? यानंतर महर्षी आपल्या शिष्यांसह तेथून तीन मैल अंतरावरील त्या शेतकऱ्याच्या घरी पायी गेले व त्याची परवानगी घेऊनच त्यांनी ते फूल तोडले.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८०६ – फ्रेंच आर्मी बर्लिनमध्ये दाखल झाली.
- १९७० – लुईस नील यांना नोबेल पुरस्कार मिळाला.
- २००६ – पाकिस्तानचा फलंदाज मोहम्मद युसूफ याने एका वर्षात आठ शतक झळकविण्याचा विक्रम केला.

### राष्ट्रीय

- २००६ – शास्त्रज्ञांनी ओरिसाच्या तटीय भागात दोन वेगवेगळया स्थळांहून जमिनीवरुन जमिनीवर मारा करणाऱ्या दोन पृथ्वी क्षेपणास्त्रांची एकत्रित यशस्वी चाचणी केली.
- २००६ – सानिया मिर्जाचे नाव जगातील टॉप टेन टेनिस सौंदर्यसम्राज्ञींमध्ये समाविष्ट झाले.
- २००७ – तिरुचिरापल्ली येथील बीएसएनएलचा एक कर्मचारी जे.जॉन सेल्वराज यांनी कंगव्याने २४ तास संगीत वाजविण्याचा विक्रम केला.

### जन्म

- १८७० – दत्तात्रेय बळवंत पारसनीस, महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध इतिहास संशोधक व ऐतिहासिक साधनांचे संग्राहक.
- १८७३ – भा. रा. तांबे, ग्वाल्हेर संस्थानचे राजकवी.
- १८८१ – काशीप्रसाद जयस्वाल, प्रसिद्ध भारतीय प्राच्यविद्या पंडित व कायदेपटू.
- १८८८ – गणेश वासुदेव मावळंकर, लोकसभेचे पहिले सभापती.

### निधन

- १७९५ – सवाई माधवराव, अंतर्गत कलहाने खिन्न झालेले शूर व मुत्सद्दी पेशवे.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४८



### आडवे शब्द

१. '.... एकांती मजसमीप तीच तू ही कामिनी' सुधीर फडके यांचे शांता शेळके रचित भावगीत
१०. दु:ख
११. जोम की वेदना?
१२. रजनी, यामिनी
१४. अवधान, लक्ष
१५. मृत्तिका
१६. नृत्यू
१७. उगीच
१९. दिवस
२०. कुबेराचा सेवक
२१. जिव्हा, जीभ
२३. वर्ष, सन
२४. गवंडी
२६. अवास्तव, अवाच्या सवा
२९. राज ठाकरे यांचा पक्ष
३१. प्रत्येक
३२. विदूषक-प्राण्यांचा खेळ
३३. श्रीकृष्णाचा अर्जुनला उपदेश
३४. श्वसनेंद्रिय
३५. उबदार पांघरुण (इंग्रेजी)
३६. इतके
३७. नुकसान
३८. अंगाने जाड, स्थूल
३९. चलाख, शहाणा
४०. चांदणी
४१. मालक
४३. महाराष्ट्राचे छत्रपती
४५. सामान्य, साधारण
४७. शोध, माग
४९. हत्ती
५१. पंख
५२. रमणीय
५३. कूळ कायद्याचे तत्त्व
५६. बस्तान
५८. चेष्टेखोर
६०. समोरासमोरची चकमक
६१. फळातील खाण्याचा भाग
६२. लोकनाट्य
६३. न्याहरी
६४. पातक
६५. प्रचंड आरडाओरड, गोंधळ
६६. आपलेपणा
६७. सगळीकडे
६८. शंकर
६९. वडिलांची आई
७०. एक मिश्र धातू
७१. सुंदर तरुणी
७२. गप्प बसणे
७३. उद्याच्या नंतरचा दिवस

### उभे शब्द

२. विनिमयाचे साधन
३. गरीब
४. डोके, वरचा भाग
५. महाराष्ट्रात या दोन विरोधी पक्षांची युती आहे
६. टिकाव
७. सजीव निर्जीव सर्व भाग
८. पालवी फुटण्याचा मराठी महिना
९. वेदना
१३. मोठा हातोडा
१७. च्या शिवाय
१८. रात्री चमकणारा कीडा
२२. चंदन उगाळण्याचे साधन
२३. धैर्य
२४. देशस्तवन
२५. वारा
२६. अगम्य
२७. विष
२८. लढतना आलेला मृत्यू
२९. चर्चा
३०. सैन्य
३६. नाराजी
३७. ऐट, दिमाख
३९. शिव्याशाप
४०. नुकतीच खुडलेली (भाजी, फुले इ.)
४२. खात्री
४४. गर
४६. खोटे कारण
४८. वाकडा नसलेला
५०. वतनदार
५३. पंकज
५४. राजीनामा
५५. भेग, फट
५७. मशाल हातात धरणारा
५९. चौकशी
६०. शेतजमिनीवरील कर ६२. बूड, सैन्याचा मुक्काम
६३. विरक्त
६४. गणपतीची आई
६५. गुढ, अवघड
६६. चालू दिवस
६९. कुंभाराची भट्टी

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ४५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कणीदार ४.कटावर ७.परंपरा ११.मोजदाद १३.खासदार १५.रामदास १७.रसद १९.सरदार २०.नभ २१.नख २२.मरवा २४.अबोल २५.वसवस २७.पार २८.नयन ३०.सावध ३२.राम ३३.वाम ३५.साव ३६.शिवजी ३८.राक्षस ४०.डरावडराव ४३.रक्षक ४५.जमानत ४७.माका ५०.पसा ५२.रमण ५४.आज ५५.हयातभर ५७.मानवता ५९.सभाधीट ६०.यजमान ६१.काकडी ६३.पाक ६५.कवच ६६.रया ६८.वाटप ७०.रक्तदान ७३.तनमन ७४.सहसा ७७.चालना ७८.नगर ८०.आदानप्रदान ८३.रद्द ८४.जरतर ८५.वाकडातिकडा

उभे उत्तर : १.कपार २.दामोदर ३.रज ४.कदरदान ५.वखार ६.रस ७.पर ८.पराभव ९.राम १०.खसखस १२.दास १४.दासबोध १६.दानव १८.समरस २३.वानवा २४.अवघड २६.सदाशिव २७.पारावार २९.यमराज ३१.सवड ३४.बेसन ३५.सावकार ३७.त्रिक ३९.जमा ४१.रामा ४२.रावणभात ४४.क्षमायाचक ४६.तपन ४८.सांज ४९.उभयचर ५१.सावकाश ५३.मस ५४.आटपाटनगर ५६.रज ५७.मानधन ५८.ताक ६२.डीर ६४.कप ६७.यातना ६८.वामन ६९.विसराळू ७१.दावेदार ७२.अचानक ७५.सावज ७६.विप्र ७९.रद्दड ८०.आत ८१.दावा ८२.झोक

# पारनेर तालुक्यात RDSS योजनेचा बोजवारा

- दोन वर्षांपासून कामे ठप्प
- चिंचोलीत अर्धवट कामे; दोन वर्षांपासून खांब-रोहित्र उभे, वीज मात्र अद्याप घरात नाही



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यात केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी 'रिव्हॅम्प्ड डिस्ट्रिब्यूशन सेक्टर स्कीम' (RDSS) अर्थात नवीन वीज क्षेत्र योजना पूर्णपणे कोलमडली आहे. २०२१ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या या योजनेचा उद्देश ग्रामीण भागात प्रत्येक घरात विश्वासार्ह वीज पोहोचवणे हा होता. मात्र पारनेर तालुक्यात ही योजना रखडली असून अनेक गावांमध्ये कामे अर्धवट सोडून ठेकेदार पसार झाल्याचे चित्र आहे. चिंचोली, पिंपरी जलसेन, सांगवी सूर्या, गांजीभोयरे आदी भागात RDSS अंतर्गत कामांना सुरुवात झाली होती. चिंचोली येथील पिंपरकर मळा, भगतवस्ती, बांगरवाडी परिसरात विद्युत रोहित्र व खांब उभे करण्यात आले. मात्र गेल्या दोन वर्षांपासून ही कामे पूर्णपणे बंद आहेत. वीज वितरण लाईन जोडलेली नाही, तारा रस्त्यावर पडलेल्या आहेत. यामुळे ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वस्त्यांवर आजही घरात वीज पोहोचलेली नाही. या रखडलेल्या कामांचा सातत्याने पाठपुरावा करणारे चिंचोली येथील शिवसेना नेते माजी सरपंच सतीश पिंपरकर यांनी महावितरण व प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या. मात्र उडवा-उडवीची उत्तरे मिळत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. दोन वर्षांपासून फक्त आश्वासने मिळत आहेत, प्रत्यक्ष काम शून्य, असे पिंपरकर म्हणाले. आता संयम सुटल्याची भावना व्यक्त करत सतीश पिंपरकर यांनी इशारा दिला आहे की, लवकरच हे काम मार्गी न लागल्यास महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन छेडले जाईल आणि आक्रमक भूमिका घेतली जाईल. ग्रामस्थांच्या या न्याय्य मागण्याकडे महावितरण व प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन RDSS योजनेंतर्गत रखडलेली कामे त्वरित पूर्ण करावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ठेकेदार व प्रशासकीय अधिकारी यांच्यात आर्थिक तडजोडी न समाधानकारक न झाल्यामुळेच पारनेर तालुक्यात आर डी एस एस योजना सध्या शेवटच्या घटकात मोजत आहे असा प्रकार आहे या योजनेचे काम पूर्णपणे ठप्प आहे.



खोडद : जुन्नर तालुक्यातील नारायणगाव ते आळेफाटा आणि साळवाडी ते शिरोली सुलतानपूर या दोन्हीही रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी तर रस्ता उखडला असून वाहनचालकांना वाहन चालविताना कसरत करून वाहन चालवावे लागत आहे.त्यामुळे या दोन्हीही रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी परिसरातील नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे केली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### कृ.उ.बा स जुन्नर येथे नाफेड हमीभाव केंद्र योजना सुरू

शिवनेरी (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर येथे नाफेड हमीभाव केंद्र, शासकीय हमीभाव खरेदी योजना २०२५ /२६ या वर्षाकरिता एफ ऐ क्यु दर्जाचे सोयाबीन खरेदी करण्यात येईल अशी माहिती सभापती संजय काळे यांनी सांगितले आहे .सभापती संजय काळे पुढे म्हणाले की , शेतकरी बांधवांनी ऑनलाइन नोंदणीसाठी ७/ १२ अद्यावत पीक नोंदणी सह , आधार कार्ड, बँक खाते झेरॉक्स , स्वतःचा मोबाईल, स्वतः शेतकरी बायोमेट्रिक करिता हजर राहणे गरजेचे आहे .यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर व उपबाजार आवर नारायणगाव येथे शेतकरी बांधवांनी संपर्क साधावा असे सभापती संजय काळे यांनी सांगितले.




### चिल्हेवाडीत बालचमुंनी केला संविधानाचा जागर

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिवस म्हणून संपूर्ण देशात सन २०१५ पासून साजरा केला जातो.आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिल्हेवाडीतील विद्यार्थ्यांनी संविधानाचा जागर केला. गावात प्रभात फेरी काढण्यात आली. लोकशाहीचा जागर,संविधानाचा आदर या घोषणा देत गावात जागर केला. संविधान पुस्तिका,संविधान उदेशिका,बॅनर घेत घोषणा देत मुलांनी शाळा ते ग्रामपंचायत कार्यालय चिल्हेवाडी पर्यंत प्रभात फेरी काढली.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संविधान सभेतील मुसुदा समितीने भारतीय संविधान तयार केले.आज देशाचा कारभार संविधानानुसार चालत आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या मूलभूत हककांवरोबर कर्तव्याचे भान राखावे विद्यार्थ्यां मध्ये नागरिकत्व, जबाबदारी, सहकार्य, सामाजिक संवेदन- शीलता आणि लोकशाही मूल्ये दृढ व्हाव्यात.या या उद्देशाने संविधान दिन साजरा करण्यात येत आहे.आजचा संविधान दिवस विद्यार्थ्यांनामूल्याधिष्ठित शिक्षणाचा अनुभव देणारा ठरला.ग्रामपंचायत कार्यालय चिल्हेवाडी येथे विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी संविधान उद्धेशिका सामूहिक रित्या म्हटली, शाळेत चित्रकला रंगभरन,प्रश्नमंजुषा स्पर्धा संविधान दिनाच्या निमित्ताने घेण्यात आली.सदर प्रभात फेरी मध्ये शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनोद भोईर, गणेश भोईर, संजय ठोंगिरे पोलिस पाटील राजेंद्र भोईर, गिरजाभाऊ भोईर, भरत भोईर, मनोहर मुंढे, जयश्री भोईर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक प्रभाकर दिघे,उपशिक्षक जनार्दन केदारी यांनी केले.

### चाईल्ड फंड इंडियामार्फत शैक्षणिक साहित्य वितरण



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : चाईल्ड फंड इंडिया या संस्थेची भारतातील ४१ वर्षांची कार्ययात्रा पूर्ण होत असताना,गेल्या दोन महिन्यांपासून विविध देणग्यांच्या मदतीने मुलांसाठी शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत.याचउपक्रमाचा भाग म्हणून जुन्नर तालुक्यातील दानशूर लोकांनी चाईल्ड फंड इंडिया या संस्थेचे प्रकल्प अधिकारी अभिजित मदने व ब्रँड अँबेसिडर रविंद्र भोर यांनी केलेल्या आव्हानाला उत्कृष्ट प्रतिसाद दिल्याने डिंगोरे ता:-जुन्नर येथील नीलम लॉन्स मध्ये सुमारे २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य किटचे वितरण करण्यात आले. विशेष म्हणजे,देणगीदारांनी स्वतः साहित्याची पॅकिंग करून मुलांना देण्याचा उपक्रम राबवून कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरवला. या किट वितरण कार्यक्रमाला माजी जि.प. सदस्य अंकुश आमले, उदापुरचे सरपंच सचिन आंबडेकर, डिंगोरे चे उपसरपंच निलेश लोहोटे,समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष दत्ता शिंदे,मुख्याध्यापक शरद माळवे, हडसरच्या सरपंच नीता कारभळ,राष्ट्रीय स्थायीविकास संस्थेचे प्रकल्प अधिकारी विजय शिंदे,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर,पराग जगताप व मिथून मोजाड यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. यासोबत स्थायी विकास संस्थेचे प्रकल्प प्रमुख विजय शिंदे,चाइल्डफंडचे शील सर, कम्युनिकेशन मॅनेजर सुधीर कुमार व विलो मॅडम यांनीही उपस्थिती लावून कार्यक्रमाला विशेष उर्जा दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनात अभिजीत रामदास मदने यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उपक्रम समन्वयात मुक्ता गिरी,अजित सोर,प्रवीण जगताप व ज्योति शिवमोरे यांचे योगदान उल्लेखनीय ठरले.स्थलव्यवस्थेत दिपाली जगताप,शेवंता वाघ व कविता घोलप यांनी उत्कृष्ट काम केले.तसेच रवी शिंदे, मंगेश आतकर,योगेश मस्करे, शहाजी कसबे,विश्वास गालफाडे,अनंता बोऱ्हाडे,संजय नवले,रामदास दाभाडे, सागर बोराडे,कृष्णा नवले,रोहित शिंदे आणि इतर अनेक कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

# चंपाषष्ठी उत्सवात धार्मिक कार्यक्रम, भंडारा आणि भव्य पालखी मिरवणुकीसह भक्तिभावाने साजरा



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

चंपाषष्ठीच्या पावन पर्वानिमित्त भिंगारदिवे मळयातील जय मल्हार योगी मठ भक्त मंडळाच्या वतीने आज दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी पहाटेच्या मंगलप्रकाशात मंदिरात शंखनाद, घंटानाद आणि 'जय मल्हार' च्या जयघोषांनी वातावरण भारावून गेले. देवदर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

सकाळी महाअभिषेक, विशेष पूजाविधी पार पडले. मंदिर परिसर फुलांनी, दीपांनी आणि आकर्षक तोरणांनी सजविण्यात आला होता.

उत्सवाचा मुख्य सोहळा म्हणजे पालखी मिरवणूक भुतकरवाडी भिंगारदिवे मळा येथून दुपारी मोठ्या थाटात काढण्यात आली. ढोल-ताशांच्या जोरदार निनादात, हलगीच्या तालावर, तसेच 'येलकोट येलकोट जय मल्हार' च्या जल्लोषात श्री खंडोबाची पालखी मंदिरातून भिंगारदिवे मळा ते सावेडी गावांतील जय मल्हार युवा प्रतिष्ठानचे पावन खंडोबा मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली होती.या मिरवणुकीत शंकर महाराजाच्या मूर्तीचाही सहभाग होता.

रस्त्यांवर भाविकांनी उभे राहून पालखीचे स्वागत केले. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत ओवाळणी करत मिरवणुकीला दिव्य रूप दिले. यावेळी श्री सदगुरू योगी योगेश्वर नाथ महाराज या मिरवणुकीत सामील झाले होते.

तसेच ठिकठिकाणी फुलाचा वर्षाव व भंडाऱ्याचा उधळण , जयघोष, औक्षण यांमुळे वातावरण अत्यंत उत्साहवर्धक झाले होते. ठिकठिकाणी मिरवणुकीचं स्वागत होत होते मिरवणूक संपल्यानंतर भाविकांसाठी भंडाऱ्याची व्यवस्था करण्यात आली होती. चंपाषष्ठीच्या निमित्ताने दिवसभर झालेल्या कार्यक्रमात शिस्तबद्ध सहभाग, सुव्यवस्थित व्यवस्था आणि भाविकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात भक्ती, समर्पण आणि उत्साहाचं अनोखं वातावरण पसरलं होतं. भाविकांनी श्री खंडोबाच्या चरणी आरोग्य, समाधान, चैतन्य आणि सुख-समृद्धीच्या मनोकामना व्यक्त केल्या.

# तपोवन परिसरात आढळली बिबट्याची ३ पिल्ले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



तपोवन रस्त्यावरील ढवणवस्ती परिसरात असलेल्या कराळे मळ्यात मंगळवारी (२५ नोव्हेंबर) दुपारी ऊसाच्या शेताशेजारी बिबट्याची ३ पिल्ले आढळली. वनविभागाच्या पथकाने तातडीने त्या ठिकाणी धाव घेत ही पिल्ले ताब्यात घेतली. तसेच मादी बिबट्याला पकडण्यासाठी दुपारी त्या परिसरात पिंजरा लावण्यात आला आहे.सावेडी कचरा डेपोजवळ असलेल्या कराळे मळ्यातील शेतात काही महिला व पुरूष काम करत असताना दुपारच्या सुमारास त्यांना बिबट्याची ३ पिल्ले दिसली. त्यांनी परिसरातील नागरिकांना ही माहिती दिल्यावर तेथे पिल्लांना पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली. काही तरूणांनी तर या पिल्लांना हातात घेत मोबाईलमध्ये फोटो, व्हिडीओ काढले. काही तरूण पिल्लांना हातात घेत असल्याचे पाहून मादी बिबट्या ऊसाच्या शेतातून बाहेर आली.

# श्रीराम मंदिराच्या धर्मध्वजाच्या स्थापनेनिमित्त आनंदोत्सव

- पवननगर येथील श्रीराम मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम साजरे
- प्रभू श्रीरामाचे मंदिर विश्वासाठी ऐक्याचे प्रतीक-राजश्रीताई कडलग

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



पाईपलाईन रोड पवन नगर येथील श्रीराम हनुमान मंदिरात मंदिर अर्चक पुरोहित आयाम, विश्व हिंदु परिषद,दक्षिण जि. नगर भाजप व सकल हिंदु समाज यांचे वतीने श्रीक्षेत्र आयोध्या,श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास येथे धर्म ध्वज स्थापने निमित्ताने श्री रामरक्षा स्तोत्र पठण, हनुमान चालीसा, रामरक्षा व महाआरती या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी हभप प्रेममूर्ती राजेंद्र महाराज कडलग, ह.भ.प. राजश्रीताई कडलग कीर्तनकार, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, मिलिंद मोभारकर, विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, भाजपा जिल्हा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे, महिला अध्यक्ष प्रियाताई जानवे, किरणताई संपतराव बारस्कर, उत्कर्ष गिते, राजेंद्र चुंबळकर, चंद्रकांत दगडे,अनिल दुतारे, मातृशक्तीच्या हिराबाई शहापुरे, रंजनाताई उकिर्डे , राजश्री पोहेकर आदींसह श्रीराम सेवा समिती व सीतामाई भजनी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राजश्रीताई कडलग म्हणाले, आयोध्या येथे साडेपाचशे वर्षाच्या संघर्षानंतर प्रभू श्रीरामाचे भव्यदिव्य असे मंदिर निर्माण झाले आहे.प्रभू श्रीराम मंदिराच्या शिखरावर भगवा धर्मध्वज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते फडकविण्यात आला आहे. प्रभू श्रीरामाचे मंदिर विश्वासाठी ऐक्याचे प्रतीक आहे. सनातनी हिंदूंना प्रेरणा देणारे ठरेल. रामध्वजाचं वैशिष्ट्ये -१६१ फूट उंचीच्या शिखरावर ४२ फूट उंचीची रामध्वज. रामध्वज जमिनीपासून १९१ फूट उंचीची आहे. रामध्वज केशरी रंगाची, ११ फूट रुंद आणि २२ फूट लांब असून गावाच्या पाच किलोमीटर अंतरापासून हा ध्वज दृष्टिक्षेपात दिसेल.असे निरूपण राजश्री ताई कडलग यांनी केले आहे.

# अहिल्यानगर शहरात संविधान दिन उत्साहात साजरा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने संविधान गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मार्केटयार्ड समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधानाच्या उपदेशकेचे सामूहिक पठन करण्यात आले. यानंतर संविधान रक्षक आमदार संग्राम जगताप यांना संविधान उपदेशकेची प्रत देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सुरेशभाऊ बनसोडे, प्रा. माणिक विधाते, परिमल निकम, अजय साळवे, संजय खामकर, रवींद्र कांबळे, रेशमाताई आठरे, लतीका पवार, विशाल कांबळे, संतोष पाडळे, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, प्रकाश वाघमारे, सतीश शिरसाट, सुरेश वैरागर, समीर भिंगारदिवे, किरण गायकवाड, सुभाष वाघमारे, सुहास पाटोळे, विनोद कांबळे, संतोष नवसुपे, येसुदास वाघमारे, वैभव औटी, सौरभ कांबळे, दीपक सरोदे, सुजन भिंगारदिवे, गणेश कांबळे, शिवाजी भोसले, विजय कांबळे, गणेश केदारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या भारतीय संविधानामुळे जगाला प्रगल्भ लोकशाहीची प्रचिती आली. राजेशाहीचा अंत करून देशाची सूत्रे सर्वसामान्य मतदारांच्या हातात दिली. संविधान हे एका समाजापुरते नसून सर्व भारतीयांचे आहे.

# निघोज व लोणी मावळा परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील विविध भागांतील शेतकरी जंगली श्वापदांच्या धास्तीमुळे वा तत्सम कारणांमुळे गेल्या अनेक दिवसांपासून दिवसा वीजपुरवठा मिळावा यासाठी सातत्याने मागणी करत होते. शेतीच्या सिंचनासाठी वीजचे लोडशेडींगमुळे पीकांना पाणी देणे, पिण्यासाठी वा इतर वापरासाठी पाणी भरणे, विजेवर आधारित नित्याच्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री चालविणे यासारखी महत्त्वाची कामे करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. मात्र आता निघोज व लोणी मावळा येथील सोलार ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून ही गरज पूर्ण होणार असून निघोज व लोणी मावळा परिसरातील शेतकऱ्यांना उद्यापासून दिवसा वीज उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

# नेते निष्ठा, इट इज "ओके" भालेकर व शेलार यांच्यावर चंद्रकांत चेडे यांचे आरोप

- पारनेर शहराचे राजकारण आरोप प्रत्यारोपांनी तापले
- चंद्रकांत चेडे यांची पत्रकार परिषद

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीनंतर पारनेर शहरात राजकीय वातावरण तापले आहे. पारनेर शहर विकास आघाडीचे प्रमुख चंद्रकांत चेडे यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर गंभीर आरोप करत खासदार निलेश लंके यांना केंद्रबिंदू ठेवून टीकास्त्र सोडले. आहे. पत्रकार परिषदेत बोलताना चेडे यांनी अर्जुन भालेकर यांच्या पत्नी माजी उपनगराध्यक्षा सुरेखाताई भालेकर आणि नगरसेवक भूषण शेलार यांच्यावरही जोरदार हल्ला चढवला. चेडे म्हणाले की, तीन वर्षांपूर्वी पारनेर शहर विकास आघाडीच्या माध्यमातून सुरेखाताई भालेकर व भूषण शेलार यांना निवडून आणून नगरसेवक बनवले. मात्र, त्यांनी माझ्यासोबत कोणताही संपर्क किंवा समन्वय ठेवला नाही.

खासदार निलेश लंके यांनी भालेकर व शेलार यांना या तीन वर्षांत अशी कोणती ताकद दिली किंवा राजकीय पुनर्वसन केले, ते त्यांनी दाखवून द्यावे, असा सवाल चेडे यांनी उपस्थित केला. सत्ता हाती असतानाही पारनेर शहरात कोणती विकासकामे मार्गी लागली, हे भालेकर यांनी सिद्ध करावे, असेही ते म्हणाले. प्रश्न व समस्या सोडवणे हा त्यांचा विषयच नाही. नेते निष्ठा इट इज ओके असे म्हणत चंद्रकांत चेडे यांनी खिल्ली उडवत टोला लगावला.

पारनेर शहरातील अनेक समस्या जशाच्या तशाच आहेत, याकडेही चंद्रकांत चेडे यांनी लक्ष वेधले. पाण्याचा प्रश्न कायम आहे, नगरपंचायतीला स्वतःची इमारत नाही, शहरातील रस्ते दुरवस्थेत आहेत, तर कचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर आहे. भालेकर व भूषण शेलार यांनी खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून या प्रश्नांसाठी कोणते प्रयत्न केले, हे जनतेसमोर येऊन दाखवावे, अशी मागणी चेडे यांनी केली. यांच्यामुळेच पारनेर शहराच्या विकासाला खिळ बसली आहे, असा आरोपही त्यांनी केला.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या संदर्भातही चंद्रकांत चेडे यांनी टीका केली. भालेकर व शेलार यांनी खासदार निलेश लंके यांना शहरातून किती मताधिक्य मिळवून दिले, हे तपासले पाहिजे. यांच्यामुळेच विधानसभेला राणीताई लंके यांचा पराभव झाला, असे चेडे म्हणाले. निलेश लंके यांनी हे लक्षात घेऊन योग्य निर्णय घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

विधानसभा निवडणुकी नंतर महायुतीची सत्ता राज्यात आल्यानंतर निष्ठेची भाषा करणारे माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांनी खासदार सुजय विखे यांच्या समवेत किती बैठका घेतल्या हे एकदा स्पष्ट करावे. आणि मी खोटं बोलत असेल तर पारनेरच्या भैरवनाथाच्या मंदिराची पायरी चढावी आणि मगच निष्ठा शिकवावी असे चंद्रकांत चेडे म्हणाले चेडे यांनी यावेळी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर गंभीर आरोप केले.

### राणीताईंच्या पराभवाला भालेकर व शेलार जबाबदार...

चंद्रकांत चेडे यांनी निवडणूक निकालांचाही मुद्दा उपस्थित करत लोकसभा निवडणुकीत खासदार निलेश लंके यांना पारनेर शहरातून किती मताधिक्य मिळाले, हे भालेकर आणि शेलार यांनी सांगावे. त्यांच्याच दाव्याप्रमाणे शहरात त्यांचा प्रभाव असेल तर मतदानाचा आकडा तरी दाखवावा. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, विधानसभा निवडणुकीत राणीताई लंके यांचा पराभव याच मंडळींमुळे झाला हे आता खासदार निलेश लंके यांनीही लक्षात घेतले पाहिजे. हेच राणीताईंच्या पराभवाला जबाबदार आहेत, असा थेट आरोप चेडे यांनी केला.

# 26 नोव्हेंबर भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

डिंगोरे ता:-जुन्नर येथील पुष्पावती विद्यालयात २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्व,त्याची रचना व मूल्ये याबाबत सर्वसमावेशक माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाची विद्यार्थिनी कु.परी भिसे हीने संविधान उद्देशिकेचे वाचन केले शिक्षक प्रतिनिधी वैभव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाचे महत्त्व समजावून सांगितले.




त्यांनी सांगितले की, २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने संविधान स्वीकारले व २६ जानेवारी १९५० पासून ते देशात लागू झाले. जगातील सर्वात मोठे लिखित संविधान म्हणून भारताची राज्यघटना ओळखली जाते. देशमुख यांनी सांगितले की संविधान तयार होण्यासाठी २ वर्ष ११ महिने १८ दिवस सतत काम झाले.संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य अतुलनीय असून त्यांना "भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार" म्हणून सन्मान दिला जातो. आज देशातील सर्व कारभार हा संविधानात दिलेल्या तत्त्वांनुसारच चालतो,हेही त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यां कडून संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानाच्या मूलभूत मूल्यांची उजळणी करण्यात आली. विद्यालयात निबंध, भाषण आणि जनजागृती उपक्रमांनी संविधान दिनाचे औचित्य अधिक संस्मरणीय झाले.

याचबरोबर, २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. त्यांच्या वीरता आणि बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळले.



नांदेड जिल्हा : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधान शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपस्थित अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही पुष्प अर्पण करून आदर व्यक्त केला. यानंतर कुलगुरू डॉ. चासकर यांच्या उपस्थितीत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच विद्यापीठ परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रासह विविध संकुलांमध्येही उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...




### दिव्यातील आर्य गुरुकुल इंग्लिश शाळेत संविधान दिन साजरा

ठाणे (स. गांवकरी) : भारतीय संविधान स्वीकार दिन अर्थात संविधान दिनानिमित्त आर्य गुरुकुल इंग्लिश स्कूल, दातीवली, दिवा येथे दिनांक 26 नोव्हेंबर 2025 रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जनजागृती निर्माण करणे तसेच त्यांना लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणे तसेच आपल्या स्वतंत्रतासाठी लढा दिलेल्या व्यक्तीना आदरांजली देणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या प्रस्तावनेच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी संविधानाच्या आदर्श मूल्यांचे पालन करण्याची शपथ घेतली. तसेच शाळेतील छोटे विद्यार्थी आपल्या स्वतंत्रता साठी लढलेल्या महान व्यक्तीच्या वेषात शाळेत आले होते. नंतर पुढे वादविवाद स्पर्धा घेण्यात आली सदर स्पर्धेचा विषय सोशल मीडिया आणि विद्यार्थी अभिव्यक्ती स्वातंत्र्य असा होता. सदर स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आपली उत्तम मते मांडली. प्रसंगी शाळेचे सर्वेसर्वा ॲड. तुषार चंदर म्हात्रे यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना वृद्धिंगत होत असून त्यांना संविधानातील मूल्यांची अधिक सखोल समज, सार्वजनिक बोलण्याचे कौशल्य, आत्मविश्वास व विचार मांडणी क्षमता वाढीस लागेल असे म्हणाले. तर शिक्षक स्वप्निल विभुते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाचे महत्त्व पटवून देऊन विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले. प्रसंगी शाळेच्या मुख्यध्यापिका सौ प्रियंका ठीकेकर तसेच सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ओवी सातपुते लहान गटात व कस्तुरी राऊत मोठ्या गटात प्रथम



अकोले (स. गांवकरी) : माय मराठी अध्यापक संघ,अकोले आयोजित स्वर्गीय ऑ . कॉ . शांताराम वाळूंज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अगस्ती विद्यालय ,अकोले येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत अभिनव शिक्षण संस्था संचालित, वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थिनींनी प्रथम पारितोषिक पटकावले . १ ली ते ४थी या गटात कु. ओवी शरद सातपुते - प्रथम क्रमांक पटकावला. तिला रोख १२०१/- रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ८वी ते १०वी गटात कु. कस्तुरी दीपक राऊत हिने प्रथम पारितोषिक पटकावले. तिला ही रोख १५०१/- रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत आरोही शेळके , आदिती मिसाळ , मंजिरी देशमुख , तनिष्का तोरमल यांनीही सहभाग नोंदविला होता. या सर्व विद्यार्थिनींना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कु. ओवी शरद सातपुते व कु .कस्तुरी दीपक राऊत यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष व प्राचार्या डॉ. सौ. जयश्री देशमुख, सहसचिव अल्फोन्सा डी., उपप्राचार्य राधिका नवले यांनी अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या . सहभागी विद्यार्थ्यांना पालक व मराठी शिक्षिका उज्वला मुसळे, अरुणा बगनर आणि त्रिवेणी घोडे व वर्षा गोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

### कॉंक्रीटच्या जंगलात फुलवली भात शेती

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुका हा आदिवासी तालुका म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो प्रचंड पावसाचे प्रमाण असल्यामुळे येथील भात शेती हा प्रमुख व मुख्य व्यवसाय मानला जातो. परंतु अकोले शहरालगत निळवंडे धरणाच्या उजव्या कॅनलची निर्मिती झाल्यापासून पावसाळ्यात कॅनॉलच्या दोन्ही बाजूला उकळ्याचे पाणी प्रवाहित होत असल्याने अकोल्यातील शहरी भागातही भात शेतीचा नवीन ट्रेंड सुरू झाल्याचे दिसत आहे. यावर्षी धुमाळवाडी, औरंगपूर, इंदोरी, रुंभोडी, नवलेवाडी, परखतपूर, वाशेरे या अकोले शहरालगत असणाऱ्या गावांतही मोठ्या प्रमाणात भाताची लागवड करून चांगल्या प्रतीचे साळीचे उत्पादन शेतकरी घेताना दिसत आहे. गेली सहा महिन्यापासून सततच्या पावसाने येथील शेतकऱ्यांना अन्य पीक घेणे शक्य होत नसल्याने उच्च प्रतीच्या इंद्रायणी भात शेतीला प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. कृषी विभागाच्या माध्यमातून मार्गदर्शन घेऊन धुमाळवाडी येथील शिवाजीनगर या शहरी भागात श्री प्रशांत धुमाळ यांनी आधुनिक पद्धतीने इंद्रायणी जातीच्या भाताची लागवड करून कॉंक्रीटच्या जंगलात भातशेती फुलवन्याचा यशस्वी प्रयोग केला आहे. मान्सूनच्या सुरुवातीलाच भाताच्या रोपाची पेरणी करून दीड महिन्यात उत्कृष्ट रोपाची निगा राखून चतुसूत्री भाताची लागवड करत अकोल्याच्या शहरी भागातही तीन महिन्यात एकरी जास्तीत जास्त उत्पादन घेतले जात असल्याचे मत श्री धुमाळ यांनी व्यक्त केले. भात कापणीच्यावेळी अकोले तालुका कृषी विभागाच्या वतीने कृषी सहाय्यक अश्विनी देशमुख, रोहिणी कडलग, आनिता चौधरी धुमाळवाडी गावचा पोलीस पाटील प्रणालीताई धुमाळ श्री रावसाहेब धुमाळ दत्तात्रय धुमाळ,प्रशांत धुमाळ, लताबाई नाडे, स्नेहल हांडे, सुनिता पवार सारिका धुमाळ आदींनी भेट दिली.

# पारनेरचा चेतन रेपाळे ठरला १४ व्या उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा विजेता

## पारनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा; शिव छत्रपती संकुलचे नाव राज्यस्तरावर





चेतनने अतिशय शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळ केला. ५-० असा निकाल म्हणजे त्याच्या मेहनतीचं फळ आहे. आमच्या तालमीत ६०-७० मुले रोज मातीशी झुंजतायत. ही विजयी परंपरा पठारे कुटुंबियांच्या पाठबळाने आणि उत्तर महाराष्ट्र केसरीसारख्या स्पर्धांमुळेच टिकून आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने खेळली जाणारी ही कुस्ती आम्हाला प्रेरणा देते. चेतन आता राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र केसरी होईल, आंतरराष्ट्रीय स्तरावर ही चमकेल असा विश्वास आहे. सर्व मान्यवर, आयोजक आणि माझ्या गुरूंच्या आशीर्वादामुळे हे यश मिळालं. पुढच्या पिढीला अशीच संधी मिळावी, हीच छत्रपतींच्या चरणी प्रार्थना!

**- नगरसेवक पै. युवराज पठारे, (अध्यक्ष : शिवछत्रपती तालीम संघ, पारनेर)**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील पाथर्डी गाव येथे मनपा शाळेच्या मैदानावर २२ व २३ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित १४ व्या राजे छत्रपती शिवाजी महाराज उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार संपन्न झाला. सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेला मा. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यासह भाजप शहराध्यक्ष सुनील केदार, स्वागताध्यक्ष तथा माजी नगरसेवक सुदाम डेमसे, सुदाम कोंबडे, भगवान दोंदे, संजय नवले, पुष्पा आव्हाड, उत्तर महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष उत्तम दळवी, सोमनाथ बोराडे, प्रा. मधुकर वाघ, नामदेव गवळी, पोपट गागरे, दीपक शेठ रेपाळे, शिवाजी रेपाळे, कैलास चत्तर, राजू चत्तर आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली. स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले ओपन गटातील अंतिम लढत. पारनेर (अहिल्यानगर) येथील पुणेवाडी मधील पै. चेतन रेपाळे व धुळे येथील पै. ऋतिक राजपूत यांच्यात अटीतटीचा सामना रंगला. चेतनने आपल्या दमदार खेळाने ऋतिकला ५-० असा धूळ चारत विजेतेपद पटकावले. उपविजेतेपद ऋतिक राजपूतने मिळवले.

महाराष्ट्र केसरी २०२४ स्पर्धेत ओपन गटात तिसरे स्थान, देवा भाऊ केसरी राज्य स्पर्धेत प्रथम क्रमांक, शालेय स्पर्धेत अनेकदा सुवर्णपदक आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड असे विक्रम असलेला पै. चेतन रेपाळे सध्या शिवछत्रपती तालीम, पारनेर येथे पै. युवराज पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. तालमीत सध्या ६०-७० मुले नियमित सराव करीत आहेत.

पै. चेतन रेपाळे यास पै. हर्षवर्धन सदगीर, पै. शंकर दादा खोसे, पै. धनंजय खर्स, पै. शामलाल शर्मा, पै. नितीन पोवार यांचे मार्गदर्शन लाभले तर पै. कुंडलिक दादा पठारे, पै. बाळासाहेब पठारे, पै. यशवंत (आबा) पठारे कुटुंबीयांचा संपूर्ण पाठिंबा लाभला. उत्तर महाराष्ट्रातील मातीतील कुस्तीगीरांना प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धेने पुन्हा एकदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने खेळलेल्या कुस्तीची परंपरा जपली.

# कुटुंब नियोजनासाठी पुरुषांचा पुढाकार; सुरक्षित भविष्याची दिशा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

कुटुंबाचे आरोग्य, आर्थिक स्थैर्य आणि भावी पिढीचे सुयोग्य संगोपन करण्यासाठी कुटुंब नियोजन अत्यंत आवश्यक आहे. समाजामध्ये पुरुषांचा सहभाग वाढावा तसेच पुरुष नसबंदीचे प्रमाण वाढावे, या उद्देशाने केंद्र सरकारतर्फे दरवर्षी 'पुरुष नसबंदी पंधरवडा' आयोजित केला जातो. यावर्षी हा उपक्रम २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. ही मोहीम जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून त्यांनी सर्व आरोग्य संस्था, वैद्यकीय अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी समन्वयातून उपक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी कुटुंब नियोजनासाठी पुरुषांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन समाजात सकारात्मक संदेश निर्माण करण्याचे आवाहन केले. मोहिमेच्या संपूर्ण अंमलबजावणीचे कार्य जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# ग्रामीण भागात 'बिबट्या'च्या भीतीची सावट

- दिवसा पूर्ण क्षमतेने वीजपुरवठ्याची तातडीची मागणी
- खा. लंके यांचे महावितरणकडे लेखी निवेदन
- शेतकऱ्यांसह ग्रामीण जनजीवन विस्कळीत



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील नगर, पारनेर, राहुरी, शेवगाव, पाथर्डी, कर्जत-जामखेड, श्रीगोंदा या तालुक्यांमध्ये बिबट्यांचा मुक्त संचार वाढत असून, मानवी वस्त्यांतील हालचालींमुळे ग्रामीण जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. लहान मुलांवर, महिलांवर तसेच पाळीव जनावरांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांनी नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. अगदी शहरातही बिबट्या दिसल्याच्या घटना नोंदल्या जात असल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. यासंदर्भात खा.नीलेश लंके यांनी महावितरणला लेखी निवेदन दिले असून शेतकऱ्यांना तातडीने दिवसा पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा करण्याची मागणी केली आहे. ग्रामीण भागात रात्रीच्या वेळेसच वीजपुरवठा उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी अपरात्री शेतात जावे लागते. वाढलेल्या बिबट्या-प्रमाणामुळे आता रात्री शेतात जाणे अत्यंत धोकादायक बनले आहे. परिणामी पिकांचे नुकसान होत असून शेतकऱ्यांच्या जीवितास धोका वाढला आहे. महिलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच घटक भीतीच्या छायेत दैनंदिन कामकाज करत आहेत. या पार्श्वभूमीवर विविध गावांमधून महावितरणकडे दिवसा शंभर टक्के क्षमतेने व स्थिर दाबाने वीजपुरवठा मिळावा, अशा मागण्या सतत होत आहेत. बिबट्या-प्रभावित भागात दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाल्यास शेतामधील कामे सुरक्षित वेळेत पूर्ण करता येतील, असे नागरिकांचे म्हणणे आहे. महावितरणच्या अधिकारी अभियंत्यास पाठवण्यात आलेल्या निवेदनात पुढील मुद्दे तातडीने अमलात आणावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. बिबट्या-प्रभावित गावांमध्ये दिवसा १००% क्षमतेने व स्थिर दाबाने वीजपुरवठा देणे, वनविभाग, पोलीस व स्थानिक संस्थांशी समन्वय साधून अशा गावांसाठी विशेष बोज योजना राबवणे, देखभाल वा इतर कारणांनी अनपेक्षित वीजव्यत्यय टाळण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करणे, जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली 'आपत्कालीन वीजपुरवठा प्रोटोकॉल' तयार करणे.

# सांगवीसुर्या येथील पीर साहेब बांबांचा ऊरुस जत्रा उत्सव सुरू

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

सांगवीसुर्या येथील पीर साहेब बाबांचा उरुस जत्रा उस्तव सुरु झाल असून बुधवार दि.२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरतीच्या कार्यक्रमाने हा जत्रा उस्तव मोठ्या थाटामाटात सुरू झाला आहे.रात्री बाबांचा संदल कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी गाव व पंचक्रोशीतील भावीक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व पीर बाबांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. गुरुवार दि. २७ व शुक्रवार दि.२८ रोजी दोन



दिवस बैलगाड्यांच्या शर्यतीचे आयोजन करण्यात आले असून लाखो रुपयांच्या बक्षीसांची खैरात यावेळी करण्यात येणार आहे. तसेच रात्री मंगला बनसोडे यांच्या लोकप्रिय तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि.२९ रोजी मंगला बनसोडे यांच्या तमाशाची हजेरी कार्यक्रम सकाळी नऊ वाजता होणार आहे. तसेच दुपारी दोन वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा होणार असून यासाठी राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने नामांकित मल्ल उपस्थित राहाणार असून कुस्ती जिंकणाऱ्या मल्लांना गावकरी व कुस्ती शौकीन यांच्या वतीने हजारो रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. गुरुवार दि.२७ व शुक्रवार दि.२८ रोजी होणाऱ्या बैलगाडा शर्यतीसाठी प्रथम क्रमांक ७१ हजार रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांक बक्षीस ५१ हजार रुपये, तृतीय क्रमांक बक्षीस ३१ हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ लाखो रुपये बक्षीसे ठेवण्यात आली आहेत. लोकसहभागातून कुस्ती व बैलगाडा शर्यत यासाठी बक्षीसे देण्यात येणार असून गावकरी या पीर बाबांच्या जत्रेसाठी मोठ्या प्रमाणात लोकसहभागातून वर्गणी गोळा करून जत्रेचा सर्व आर्थिक भार घेत असतात.

# जिल्हा बँक सोनेतारण व्यवसाय वाढवणार : चंद्रशेखर घुले

**नगर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सोनेतारण व्यवसायात वाढ करणार असून त्या दृष्टीने बँकेचा सेवक हा प्रशिक्षित होणे गरजेचे असल्याने जिल्हा बँकेने सेवकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे बॅकेंचे सोने तारण कर्जावरील व्याजदर इतर बॅकांच्या तुलनेत कमी असून आता सेवकांनी टार्गेट ओरिएंट काम करण्याच्या दृष्टीने कामकाज करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चेअरमन माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी केले जिल्हा बँकेला मोठा इतिहास असून बँकेची परंपरा अतिशय उज्वल आहे. बँकेने नेहमीच शेतकरी, ग्राहकांच्या आणि सभासदांच्या हिताचे दृष्टीने कामकाज केले आहे असेही घुलेपाटील या प्रसंगी म्हाणाले बँकेच्या पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील सभागृहामध्ये बँकेचे जिल्ह्यातील शाखांतील सेवकांकरता सोने तपासणी व त्या संदर्भात आणि अडचणी संदर्भातील प्रशिक्षण वर्गप्रसंगी चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील बोलत होते.

# शेठ एन.के.टी.टी. महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा!





**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शेठ एन.के.टी.टी. महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साह, शिस्त आणि देशभक्तीच्या भावनेने प्रेरित वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात अॅकरिक टीमने उत्कृष्ट सूत्रसंचालनाने केली. कार्यक्रमात प्रमुख उपस्थित नानजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व सांगताना म्हटले की, "भारतीय संविधान हा फक्त एक ग्रंथ नाही, तर आपल्या देशाची आत्मा आहे. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन माणुसकीचा संदेश देणारे, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची ज्योत पेटवणारे हे संविधान प्रत्येक भारतीयाला आपले हक्क आणि कर्तव्य शिकवते." यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संविधान गीत, देशभक्ती गीत आणि संविधानावर आधारित रॅम्प वॉक सादर केला. रॅम्प वॉकच्या माध्यमातून समानता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सामाजिक-आर्थिक-राजकीय एकता, महिला सक्षमीकरण, मुलांचे हक्क, नागरिकांचे कर्तव्य यांसारखी मूलभूत तत्त्वे प्रभावी पद्धतीने सादर करण्यात आली.

आकर्षक पोशाख, संदेशप्रधान मांडणी आणि सर्जनशील प्रस्तुती यामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण लाभले. संविधानातील मूलसूत्रे विद्यार्थ्यांनी अत्यंत आकर्षक शैलीत मांडल्याने उपस्थित प्रेक्षकांकडून कार्यक्रमाला भरभरून दाद मिळाली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे संविधान प्रतिज्ञा घेतली. यानंतर मुख्याध्यापक सौ. लिडीया सालियन यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना संविधानाचे महत्त्व, नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या आणि राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका याबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. दिलीप पाटील, सौ. मानोशी बागची, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.